CMYK





अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. २६ नोव्हेंबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ५७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## आज भारत - ऑस्ट्रेलिया यांच्यात रंगणार दुसरा टी-२० सामना

**तिरुअनंतपुरुम** : ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० पहिल्या सामन्यात भारताने १-० ने आघाडी घेतली आहे. आता सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील टीम इंडिया टी-२० च्या दुसऱ्या सामन्यासाठी मॅथ्यू वेडच्या नेतृत्वाखालील टीम ऑस्ट्रेलियाशी भिडण्यास सज्ज आहे. २६ नोव्हेंबर रोजी तिरुवनंतपुरम येथील ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर हा सामना होणार आहे. दरम्यान पहिल्या सामन्यात टीम इंडियाने विक्रमी २०९ धावांचा पाठलाग करत २ गडी राखून ऑस्ट्रेलियाला पराभवाची धूळ चारली होती. यासाठी ऑस्ट्रेलिया प्लेइंग इलेव्हनमध्ये मोठे बदल करण्याची शक्यता आहे. पहिल्या सामन्यात सलामीवीर मॅथ्यू शॉर्ट हा अपयशी ठरला होता. त्यामुळे त्याच्या जागी विश्वचषक फायनलमध्ये शतक झळकावणारा ट्रॅव्हिस हेड याला संघात संधी मिळणार आहे.

# कोळेगाव परिसरात बिबट्याची दहशत

▸ वनविभागाने ठशावरुन बिबट्या असल्याचा अंदाज वर्तविला

▸ चार महिन्यांचे बोकड रात्रीच्यावेळी हल्ला करुन केले फस्त



सुराज्य/वेळापूर

**कोळेगाव (माळशिरस) येथील उमेश सुरेश दुपडे या शेतकऱ्याच्या दारातील चार महिन्याच्या बोकडावर रात्रीच्या सुमारास बिबट्या सदृश्य प्राण्याने हल्ला केल्याने कोळेगाव परिसरात वाड्या वस्तीवर बिबट्याची दहशत पसरली असून, या परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे रानात राहणाऱ्या शेतकऱ्यांनी आपली जनावरे बंदिस्त गोठ्यात बांधण्याचे आवाहन वन विभागाकडून करण्यात आले आहे.**

शुक्रवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी रात्री तीन वाजण्याच्या सुमारास शेळी ओरडल्याने शेतकरी उमेश दुपडे हे घराबाहेर येऊन त्यांनी बॅटरीने पाहणी केली असता घराच्या शंभर ते दीडशे फूट अंतरावर एक वन्य प्राणी बोकड ओढत घेऊन जात असताना दिसून आला. त्यावेळी त्यांनी आरडाओरड केल्याने बोकड सोडून वन्य बिबट्या सदृश्य प्राणी पळून गेला. त्यानंतर थोड्या वेळाने तो बोकडाला ओढत उसाच्या रानात घेऊन गेला. रात्रीची वेळ असल्याने शेतकऱ्याने भीतीपोटी प्राण्याचा पाठलाग केला नाही. शनिवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी सकाळी या घटनेची कोळेगावचे पोलीस पाटील दुपडे यांना दिली. त्यानंतर पोलीस पाटील दुपडे यांनी सर्व घटनेची माहिती घेऊन त्यांनी पिलीव बीट वन विभाग, वेळापूर पोलीस ठाण्याला कळविले. त्या अनुषंगाने सकाळी १० वाजता पिलीव वन विभागाचे वनरक्षक गणेश जगदाळे, वनमजूर मोहन जाधव (काळमवाडी) यांनी कोळगाव येथे घटनास्थळी भेट दिलीफ परिसराची पाहणी करहत असताना वन्य प्राण्याचा ठसा आढळून आला. या प्राण्याचा माग घेत उसात पहाणी केली असता उसाच्या बांधाच्या कडेला एक चार महिन्याच्या बोकडाचे मुंडके दिसून आले. उर्वरित बोकाडाच्या शरिराचा भाग आढळून आला नाही. वन विभागाने पाहणी करून घटनास्थळी ठशाची पाहणी केली असता सदर ठसा हा वन्यप्राणी बिबट्याचा असल्याचा प्रथमदर्शनी निदर्शनास आ ल्याचे वनरक्षक गणेश जगदाळे यांनी सांगितले.यावेळी बोलताना जगदाळे म्हणाले की, कोळेगाव परिसरातील शेतकऱ्यांनी, ग्रामस्थांनी रात्रीच्या वेळी शक्यतो घराबाहेर पडू नयेत. गरज असल्यास जमावाने शेतीची कामे करावीत. रात्रीच्या सुमारास फिरत असताना हातामध्ये बॅटरी, काठी, मोबाईलवर गाणी लाऊन शेतीची कामे करावीत. लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. रानात राहणाऱ्या शेतकऱ्यांनी जनावरे बंदिस्त गोठ्यात बांधावीत. बिबट्याची माहिती वेळापूर पोलीस स्टेशनला मिळताच वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांनी कोळेगाव परिसरात जाऊन ग्रामस्थांनी काळजी घ्यावी, असे आवाहन केले.

> सदरचा वन्य प्राणी हा ठशावरुन बिबट्या असल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न होत आहे. याबाबत कोणाला माहिती मिळाल्यास त्वरित वन विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. ग्रामस्थांनी खबरदारी घ्यावी.
>
> **– गणेश जगदाळे,**
> वनरक्षक, पिलीव बीट






**वेळापूरः कोळेगाव (माळशिरस) येथे बिबट्याने बोकडावर हल्ला केला. दरम्यान, त्याची पाहणी करताना वनरक्षक गणेश जगदाळे व सहकारी दिसत आहेत. दुसऱ्या छायाचित्रात बिबट्याचे ठसे जमीनीवर उमटल्याचे दिसत आहे.**

## मुळेगाव तांड्यातील हातभट्टीवर छापा; साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त



### राज्य उत्पादन शुल्क विभागाने केली कारवाई

सुराज्य/सोलापूर

राज्य उत्पादन शुल्क विभागाने शनिवारी पहाटेच्या सुमारास मुळेगाव तांडा व सिताराम तांडा येथील हातभट्ट्यांवर धाडी टाकून ८ गुन्ह्यात २५० लिटर हातभट्टी दारू व २३, ८५० लिटर गुळमिश्रित रसायन असा ५.५० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक यांनी सांगितले.

या छाप्यात ८ गुन्हे नोंदविले. आरोपी निकिता पवार, अनिता पवार, संजय चव्हाण यांच्या घरातून २५० लिटर हातभट्टी दारु, ५, ९०० लिटर गुळमिश्रित रसायन नष्ट केले. ही कारवाई आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, सुनिल चव्हाण, विभागीय उपायुक्त विजय चिंचाळकर यांच्या आदेशान्वये, अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या नेतृत्त्वाखाली उपअधीक्षक गुणाजी क्षीरसागर, सदानंद मस्करे, राहूल बांगर, उषाकिरण मिसाळ, सुरेश झगडे, शिवकुमार कांबळे, अक्षय भरते, मानसी वाघ, रोहिणी गुरव, कृष्णा सुळे, मुकेश चव्हाण, अलीम शेख, जवान किरण खंदारे, अनिल पांढरे, इस्माईल गोडीकट, अशोक माळी, शोएब बेगमपुरे, चेतन व्हनगुंटी,वसंत राठोड, योगीराज तोग्गी, रशीद शेख, दीपक वाघमारे, संजय नवले यांनी पार पाडली.

> **पलायन करण्यात पाच आरोपींना यश**
>
> मुळेगाव तांडा व सिताराम तांडा येथील वेगवेगळ्या हातभट्टी ठिकाणांवर धाडी टाकून पथकाने १७,९५० लिटर रसायन जप्त करुन ते जागीच नष्ट केले. पहाटेच्या सुमारास टाकलेल्या धाडीदरम्यान अंधाराचा फायदा घेऊन पाच आरोपींनी पलायन केले. त्यांना फरार घोषीत केले असून, त्यांचा शोध तपास अधिकारी करीत असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक यांनी सांगितले.

## अकलूजच्या मोहिते-पाटील साखर कारखान्यास २३ लाखास गंडविले

सुराज्य/अकलूज



अकलूज येथील महर्षी शंकरराव मोहिते-पाटील साखर कारखान्याला स्पिरिटचा पुरवठा करतो म्हणून २३ लाख ८१ हजार रुपयाची फसवणूक केल्याप्रकरणी संयुक्ता इंटरनॅशनलचे व्यवस्थापकिय संचालक संदीप डी. काकडे-देशमुख (बारामती) यांच्याविरुद्ध अकलूजच्या पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात मोहिते -पाटील साखर कारखान्यातील ॲसीड प्रकल्पाचे व्यवस्थापक संपतराव देशमुख (अकलूज) यांनी पोलिसांत नुकतीच फिर्याद दाखल केली. संयुक्ता इंटरनॅशनलचे संदीप काकडे-देशमुख यांनी कारखान्यास स्पिरिटच्या पुरवठा करतो, असे सांगून ४० हजार लिटरची ऑर्डर घेतली. त्याप्रमाणे संपतराव देशमुख यांनी त्यांच्या खात्यावर दि. ४ एप्रिल २०२३ रोजी २३ लाख ८१ हजार ५८० रुपये जमा केले होते. मात्र आरोपीने स्पिरिटचा पुरवठा न करता कारखान्याची फसवणूक केली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. तपास हवालदार पिंगळे करीत आहेत.

## इब्राहिमपूर येथे ट्रॅक्टरच्या धडकेने उसतोड कामगार ठार

सुराज्य/सोलापूर

शेतात ऊस तोडीचे काम करीत असताना ट्रॅक्टरच्या धडकेने २२ वर्षीय उसतोड कामगार तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात इब्राहिमपूर (अक्कलकोट) येथे शुक्रवारी घडला.

ओंकार चंद्रकांत शिंदे (वय २२, सलगर) असे मयत झालेल्या मजुराचे नाव आहे. तो शुक्रवारी दुपारी इब्राहिमपूर येथील शेतात उस तोड करणाऱ्या हार्वेस्टर यंत्राच्या पाठीमागे ऊस काढण्याचे काम करीत होता. त्यावेळी (एम.एच.-२४ एल. ६१५१) ट्रॅक्टर पाठीमागून धडकल्याने तो ट्रॅक्टर गंभीर जखमी होऊन मरण पावला.

याची नोंद अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसात झाली. ट्रॅक्टरचा चालक महादेव कोंडिबा लोखंडे (मारोळी, मंगळवेढा) याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल झाला आहे. तपास हवालदार राठोड करीत आहेत.



**सोलापूर : श्री व्यंकटेश्वर देवस्थान मंदिरात ब्रम्होत्सव सोहळ्याची समाप्ती वन विहार, पुष्प यज्ञ कार्यक्रमाने झाली.**

## चोरट्यांनी फोडले जवळा ग्रामपंचायत; २९ हजारांचा मुद्देमाल लंपास



**सांगोला** : अज्ञात इसमाने ग्रामपंचायत कार्यालयाचे दरवाजाचे कुलूप तोडून आत मध्ये प्रवेश करुन लाकडी टेबल, एक खुर्ची, सीसीटीव्हीचा डिव्हीआर असा २९ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल पळवून नेला. ही घटना जवळा (सांगोला) येथे घडली.

जवळा ग्रामपंचायतील १० हजार रुपये किंमतीचा लाकडी टेबल, १० हजार रुपये किंमतीची व्हील खुर्ची, ९ हजार रुपये किंमतीचा सीसीटीव्हीचा डिव्हीआर आदी साहित्य अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. चोरीची फिर्याद ग्रामसेवत दत्तात्रय रसाळ यांनी दिली आहे. ग्रामसेवक रसाळ हे दि. २४ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी ४.३० वाजता ग्रामपंचायत कार्यालय बंद करुन गावी गेलेले होते. दि. २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.१५ वाजता ग्रामपंचायतचे शिपाई जयश्री वासते यांचा मुलगा समाधान वासते याने जवळा ग्रामपंचायत कार्यालयाचे फोडल्याचे सांगितले.

दरम्यान, स्वत: ग्रामसेवक रसाळ आणि पोलीस पाटील यांनी ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन सदरच्या घटनेची माहिती घेतली. त्यावेळी लाकडी टेबल, व्हिल खुर्ची, सीसीटीव्ही डिव्हीआर चोरीस गेल्याचे त्यांना दिसून आले. घटनेचा तपास सांगोला पोलीस करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता ते ठोसा' चुकवत नाहीत !!!


कल्याण

179-70-389



# आवश्यकता आहे, तोपर्यंतच आरक्षण घ्या; नंतर ते सोडून द्या

## ■ श्रीमंतांनी आरक्षण घेऊ नये; सुशीलकुमार शिंदे यांनी मांडली स्पष्ट भूमिका

सुराज्य/सोलापूर

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी शनिवारी आरक्षणाच्या विषयावर पहिल्यांदाच भाष्य केले. आरक्षणाचा विषय, जातनिहाय जनगणना या विषयांवर पक्षापेक्षा माझे वेगळे मत आहे. शिवाजी महाराजांचे नाव घ्यायचे आणि जातीय व्यवस्थेवर काम करायचे हे मला मान्य नाही. ज्यांना आरक्षणाचा लाभ झाला आहे त्यांनी आरक्षण सोडून दिले पाहिजे, श्रीमंतांनी आरक्षणाचा लाभ घेऊ नये,असे परखड मत त्यांनी व्यक्त केले.

ओबीसींचे काढून मराठा समाजाला आरक्षण देऊ नये,अशी स्पष्ट भूमिकाही त्यांनी मांडली.एका मराठी न्यूज चॅनेलच्या मुलाखतीत ते बोलत होते. शिंदे म्हणाले की, सन १९८० पर्यंत जात हा मुद्दा राज्यात महत्त्वाचा नव्हता, १९८५ नंतर मात्र परिस्थिती बदलली. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घ्यायचे आणि जातीय व्यवस्थेवर चालायचे हे मला अजिबात मान्य नाही. जातीचा आणि आर्थिक विषयाचा काहीही संबंध नाही. पण राज्यात सुरू असलेली परिस्थिती पाहता चिंता वाटायला लागते, पुढे काय होईल सांगता येत नाही. आरक्षण देण्याचे सरकारने मान्य केले असेल तर ते त्यांनी द्यायला हवे, कायद्याच्या चौकटीत ते कसे बसवयचे हे सरकारने ठरवावे. कोणाचे आरक्षण काढून देऊ नये, स्वतंत्र कायदा केला पाहिजे. जोपर्यंत आवश्यकता आहे, तोपर्यंतच आरक्षण वापरले पाहिजे, नंतर सोडले पाहिजे. ज्यांची आर्थिक क्षमता आहे त्यांनी आरक्षणाचा लाभ घेऊ नये, असेही ते म्हणाले.



लोकसभेच्या निवडणुकीवर बोलताना शिंदे म्हणाले की, मी लोकसभा निवडणूक लढवणार नाही, हे मी जाहीर केलं आहे. मी प्रणिती शिंदे यांचं नाव सुचवलेलं आहे, पण निर्णय हायकमांड घेईल. सावरकर यांचं हिंदुत्व बाबतीतची भूमिका मला मान्य नाही, पतितपावन मंदिराबाबतीत त्यांची भूमिका मला मान्य आहे म्हणून मला ते आवडतात. पण सर्व भूमिका मान्य नाहीत.

सुशीलकुमार शिंदे म्हणाले की, मी गांधी घरण्याशी लॉयल आहे, माझ्या सारख्या माणसाला इथंपर्यंत पुढे शक्य होतं का? दलितांना पुढे आणण्याचा त्यांचा विचार आहे, त्यामुळे मी मुख्यमंत्री झालो, अन्यथा मी कधीच मुख्यमंत्री झालो नसतो. मी बीएसएफ ट्रेनिंग सेंटर, बोरमणी

> **जात हा मुद्दा महत्त्वाचा नाही :** माझ्याबाबतीत जात हा मुद्दा महत्त्वाचा ठरला असे मला वाटत नाही, कारण मी अनेकदा मी जनरल सीटवर निवडून आलोय. मी सर्वधर्म समभाव मानणारा माणूस आहे. मला मुख्यमंत्रीपद पुन्हा मिळाले नाही, त्याला जात हे कारण असावे असे मला वाटत नाही. पण सोनिया गांधी यांचा फोन होता, त्यांनी सांगितले मी तुम्हाला राज्यपाल करणार आहे, ते मी स्वीकारले.. मला याबाबतीत कुठलीही खंत वाटली नाही, उलट मला एकदा राज्यपाल व्हायचे होते, ते सोनिया गांधींनी पूर्ण केले. पण मी राज्यपाल होण्याचे स्वीकारले म्हणून पुढच्या काळात मला ऊर्जा मंत्री, गृहमंत्री केले गेले.
>
> **टीका का करत नाही? :** इंदिरा गांधी म्हणाल्या की, शिंदे आप शरद पवार पर कभी बात नही करते,.तेव्हा मी सांगितलं की मी पोलीस असताना त्यांनी मला राजकारणात आणलं. तिकीट देण्यापासून निवडणुकीच खर्च देईपर्यंत शरद पवार यांनीच केले. पण तुम्ही सांगितले तर मी टीका करतो, तेव्हा इंदिरा गांधी म्हणाल्या की लोक असे म्हणतात, पण तुम्ही अशी टीका करण्याची गरज नाही.

CMYK

# २६/११ हल्ल्याची १५ वर्षे पूर्ण

## सागरी सुरक्षेबाबत शासनदरबारी अद्याप अनास्थाच

## गांभीर्य कधी कळणार?

सुराज्य/मुंबई

**२६/११च्या दहशतवादी हल्ल्यास आज १५ वर्षे पूर्ण झाले मात्र, सागरी सुरक्षेबाबत शासनदरबारी अद्याप अनास्थाच असल्याचे दिसून येत आहे. मुंबईला लाभलेल्या ११४ किलोमीटर इतक्या मोठ्या सागरी किनाऱ्याची सुरक्षा करण्यासाठी पोलिसांकडे पुरेशा बोटी नसल्याचे धक्कादायक वास्तव आहे.**

.................................

सन २००८मध्ये करण्यात आलेल्या या हल्ल्यानंतर सागरी सुरक्षा भक्कम करण्यासाठी घेतलेल्या २३पैकी केवळ आठच बोटी वापरात आहेत. विशेष म्हणजे २२ बोटींची आवश्यकता असल्याचा पोलिसांकडून गेलेला प्रस्ताव सुमारे वर्षभरापासून शासनदरबारी धूळ खात पडून आहे. नवीन नाही, निदान जुन्या बोटींचे अत्याधुनिकीकरण करू द्या, असाही प्रस्ताव पोलिसांकडून पाठविण्यात आला आहे. मात्र त्यालाही अद्याप प्रतिसाद न आल्याने सागरी सुरक्षेबाबत असलेले गांभीर्य लक्षात येते.

अजमल कसाब आणि त्याच्या साथीदारांनी २००८मध्ये मुंबईवर आत्मघाती हल्ला केला. या हल्ल्यात १६६ जणांचा मृत्यू झाला. कसाब आणि त्याच्या साथीदारांनी पाकिस्तानातून भारतात समुद्रमार्गे प्रवेश केला. या हल्ल्यानंतर दुर्लक्षित असलेल्या सागरी सुरक्षेवर सर्वांचे लक्ष गेले. या हल्ल्याने मुंबईचा सुमारे ११४ किलोमीटरचा समुद्र किनारा असुरक्षित असल्याचे दाखवून दिले. यानंतर वर्षभरात कोट्यवधी रुपये खर्च करून यंत्रसामग्री, वाहने, बोटी यांची खरेदी करण्यात आली. मोठा गाजावाजा करून २३ बोटी, चार सिलेग' बोटी, १९ ॲम्फिबियस वाहने पोलीस दलामध्ये दाखल करण्यात आली. मात्र १५ वर्षांनंतर या सर्वांची अवस्था असून नसल्यासारखी आहे.

### 'सिलेग' आणि 'ॲम्फिबियस' भंगारात

पाण्यात आणि वेळ पडल्यास जमिनीवरही धावण्याची क्षमता असलेल्या चार 'सिलेग' बोटी २००९ मध्ये खरेदी करण्यात आल्या. परदेशी बनावटीच्या या बोटी वर्षभर नीट सुरू होत्या. मात्र, नंतर त्या वारंवार बिघडू लागल्या. न्यूझीलंडच्या कंपनीत या बोटी तयार करण्यात आल्याने त्यांचे सुटे भाग मिळत नव्हते. दुरुस्तीचे प्रशिक्षणही कुणाला दिले नाही. त्यामुळे 'सिलेग' बोटी २०१६ मध्ये भंगारात काढण्यात आल्या. समुद्रकिनारी दलदल, वाळू तसेच जमिनीवर गस्तीसाठी १९ ॲम्फिबियस वाहनांचीदेखील तीच गत आहे. ही वाहनेदेखील नादुरुस्त असल्याने पडून आहेत.



गस्तीसाठी बोटी नसल्याने पोलिसांच्यावतीने गस्तीसाठी १२ स्पीड बोट, आठ इंटरसेप्टर वेहिकल (पाठलाग करण्यासाठीच्या बोट) आणि चिखलात चालणाऱ्या दोन हावरक्राफ्ट अशा २२ वाहनांच्या मागणीचा प्रस्ताव तयार करण्यात आला. समितीने सर्वंकष अभ्यास करून इतक्या वाहनांची आवश्यकता असल्याचे सांगत हा प्रस्ताव शासनाकडे पाठवला मात्र प्रस्तावाची फाइल अद्यापही तशीच पडून आहे. जुन्या नादुरुस्त बोटी दुरुस्त करून त्यांचे अत्याधुनिकरण करण्याचा प्रस्तावही चार महिन्यापूर्वी पाठविण्यात आला आहे. मात्र त्यालाही अद्याप हिरवा कंदील मिळालेला नाही. त्यामुळे आठ बोटींनी किनाऱ्याची सुरक्षा करायची तरी कशी असा प्रश्न पोलिसांपुढे आहे. गस्त कायम आणि पुरेशी होत नाही, बोटींच्या अभावामुळे समुद्रातील संशयास्पद बोटी तपासण्यात अडचणी येत असल्याचे पोलिस सांगतात.

### डुप्लिकेट इंजिनचा फटका

मुंबई पोलिसांच्या ताब्यात दाखल झालेल्या २३ बोटींपैकी आठ कार्यरत असून, दोघांची दुरुस्ती सुरू आहे. उर्वरित १३ बोटींना डुप्लिकेट इंजिनचा फटका बसला आहे. या बोटींचा पुरवठा करणाऱ्या कंपनीने स्वस्तातील डुप्लिकेट, सेकंडहँड इंजिन वापरल्याने या बोटी बंद पडल्या आहेत. पोलिसांची फसवणूक करणाऱ्या या कंपनीविरोधात आणि या कंपीनीला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात आर्थिक गुन्हे शाखेत याआधीच गुन्हा दाखल आहे.

### त्रुटी अधोरेखित, उपाययोजना नाही

सागरी सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी नियमित कालावधीत नौदलाच्या नेतृत्वात किनारपट्टी सुरक्षा समन्वय समितीची बैठक घेतली जाते. तटरक्षक दल, सागरी पोलीस, मत्स्य व्यवसाय विभाग, पोर्ट ट्रस्ट, शिपिंग कॉर्पोरेशन, सीमा शुल्क विभाग अशा समुद्राशी संबंधित प्रत्येक विभागाचा यात समावेश असतो. सागरी सुरक्षेतील त्रुटी अधोरेखित केल्या जातात. मात्र त्यावर काहीच उपाययोजना केल्या जात नसल्याचे चित्र आहे.

## राज्यातील प्रत्येकाला मिळणार हक्काचे घर

**मुंबई :** राज्याच्या बांधकाम क्षेत्रात नवीन गुंतवणुकीस चालना देण्यासह सर्वांसाठी घरे योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी राज्याच्या नवीन गृहनिर्माण धोरणात आवश्यक गोष्टींचा समावेशाचे नियोजन केले जात आहे. त्यातून राज्यातील प्रत्येकास म्हाडा एसआरएससह इतर विकास योजनांमार्फत स्वत:चे हक्काचे घर मिळण्याचा मार्ग खुला होईल. तसेच, परवडणाऱ्या घरांना चालना देण्यासाठी राज्याच्या गृहनिर्माण क्षेत्रात गुंतवणुकीस चालना देण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी गुरुवारी केले. नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल (नरेडको) महाराष्ट्राच्यावतीने वांद्रेतील जिओ कन्व्हेन्शन केंद्रात आयोजित 'होमेथॉन २०२३' गृहनिर्माण प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.



मुंबईसह राज्यात अधिकाधिक घरांचा पुरवठा करण्याचे राज्य सरकारचा प्रयत्न आहे. पंतप्रधान आवास योजनेसह प्रत्येक व्यक्तिस म्हाडा, एसआरएसह अन्य योजनांमार्फत घर मिळावे, अशी सरकारची भूमिका आहे. त्यासाठी राज्याच्या आगामी नवीन गृहनिर्माण धोरणात त्याअनुषंगाने आवश्यक गोष्टींचा समावेश करण्याचा सरकारचा विचार आहे. त्यामाध्यमातून या क्षेत्रात अधिक विकासकांना संधी उपलब्ध होतानाच अधिक इमारती, गृहसंकुले बांधली जातील. यापद्धतीने सर्वांना घरे मिळतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

गुड न्यूज...

## निवृत्तीचे वय ६० करण्याचा विचार

सुराज्य/मुंबई

राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासह इतर अनेक महत्त्वाच्या मागण्यांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाची बैठक नुकतीच झाली.

या बैठकीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतील ५४०० ग्रेड पेची मर्यादा रद्द करण्याप्रमाणेच केंद्राप्रमाणे राज्यातील सरकारी



कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६० करण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याचे महासंघाकडून सांगण्यात आले.

सध्या राज्य शासन सेवेतील वर्ग अ, ब आणि क संवर्गातील कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे आहे; तर संवर्ग ड मधील कार्यरत कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे आहे. सध्या केंद्रीय कर्मचारी, राज्य शासनातील अखिल भारतीय सेवेतील अधिकारी, चतुर्थ सेवेतील कर्मचारी तसेच २५ घटक राज्यांमध्ये सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे आहे.

## संविधानाचा सन्मान हाच आपला आत्मसन्मान

**इंग्रजांच्या जुलमी राजवटीतून भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधानाचा स्वीकार करण्यात आला. त्यामुळे दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून भारतात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.**

खरेतर २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि आपला भारत देश प्रजासत्ताक राष्ट्र बनले. भारतात लोकशाही राज्यव्यवस्था सुरू झाली. परंतु ज्या दिवशी भारतीय जनतेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले भारतीय संविधान स्वीकारले तो दिवस समस्त भारतीय जनतेच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी क्रांती दिवस ठरला.





होय हे अगदी खरे आहे की २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस वंचित, शोषित, पीडित, विषमतेच्या गर्तेत अडकून पडलेल्या आणि जातीयतेच्या उतरंडीत खितपत पडलेल्या व तळाला असणाऱ्या लोकांसाठी समतेचा, न्यायाचा, हक्काचा, बंधुतेचा आणि सन्मानाचा दिवस ठरला. घटना मसुदा समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक परिश्रमामुळे व अगाध अशा अभ्यासू ज्ञानसंपन्नतेमुळे भारताला लिखित स्वरूपात आणि आदर्श असे संविधान मिळाले. म्हणून त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणतात हे नवीन पिढीला माहीत असणे फार गरजेचे आहे. आपण नुकताच भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला.

आता भारतीय संविधान दिनाचा अमृत महोत्सव जवळ येत आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला सन्मानाने जीवन जगण्यासाठी काही मूलभूत अधिकार दिले आहेत, काही कर्तव्ये पालन करण्याची शिकवण दिली आहे. संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार व व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे. त्याचबरोबर संचार स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, शिक्षण स्वातंत्र्य व भाषिक स्वातंत्र्य असे कितीतरी अधिकार संविधानाने सर्वांना बहाल केले आहेत. त्यामुळे व्यक्ती कोणत्याही धर्माचा, पंथाचा व जनसमुदायाचा असो, स्त्री असो की पुरुष असो, प्रत्येक भारतीय नागरिकाला समतेचा, न्यायाचा, बंधुतेचा व शिक्षण शिकण्याचा समान अधिकार मिळतो. भारतीय संविधान समस्त भारतीयांचे हित जपते. कोणाचा कनिष्ठ व कोणाचा वरिष्ठ म्हणून असा भेद करत नाही. परंतु आरक्षणाच्या मुद्द्यावरुन काही लोक भारतीय संविधानाचा म्हणावा तसा सन्मान करत नाहीत. संविधान बदलण्याची भाषा काही राजकीय लोकांनी उघडपणे केली आहे. हे असे व्यक्तव्य करणाऱ्या लोकांना इतकेच सांगावे वाटते की तुम्ही जर संविधानाचा तिरस्कार करत असाल तर तुम्ही तुमचा स्वतः चा तिरस्कार करताय

हे लक्षात घ्या.संविधान बदलण्याची भाषा करणे म्हणजे स्वतःला गुलामगिरीच्या खाईत लोटून दिल्यासारखे होईल हे ही लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे भारतीय संविधानाला जीवापाड जपणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे.

संविधान बदलण्याची वेळ आली आहे असे म्हणणाऱ्या व्यक्तिंचा कडाडून विरोध झाला पाहिजे. त्यांचा तीव्र निषेध केला पाहिजे. त्यामुळे संविधान दिनाचा गौरव करताना इतकेच सांगावे वाटते की, भारतीय संविधानाचा सन्मान व आदर करणे म्हणजे आपला स्वतःचा आत्मसन्मान जपण्यासारखे आहे. संविधान दिनानिमित्त समस्त भारतीयांना मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा!

**- बबन गुळवे, ता. अहमदपूर.**

## बांधकाम साहित्यात १२ फूटाचा अजगर

सुराज्य/ठाणे

कल्याणजवळील कांबा-वरप टाटा पॉवर परिसरात एका बांधकाम साईटवर असलेल्या बांधकाम साहित्यात लपलेल्या १२ फुट लांबीच्या अजगराला वन विभागाने प्राणी मित्रांच्या मदतीने ताब्यात घेतले असून त्याच्यावर आवश्यक उपचार करून त्याला नैसर्गिक अधिवासात



सोडले जाणार असल्याची माहिती वन विभाग आधिकाऱ्यांनी दिली.

कल्याण जवळील ग्रामीण भागात आजही जंगल असून या जंगलात मोठ्या प्रमाणावर सरपटणारे प्राणी सापडतात. मात्र, आता या परिसरात देखील इमारती उभारल्या जाऊ लागल्याने सरपटणाऱ्या प्राण्यांचा अधिवास हिरावला जात असल्याने हे प्राणी मानवी वस्तीत आढळू लागल्याचे चित्र आहे. कल्याणपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या कांबा-वरप टाटा पॉवर परिसरात मोठमोठे प्रोजेक्ट होऊ घातले असून यातीलच एका बांधकाम साईटवर मजुरांना बांधकाम साहित्यात साप असल्याचे दिसल्याने कामगारांमध्ये घबराट पसरली. यानंतर हा साप नसून अजगर असल्याचे कळताच मजूर हातातील काम टाकून पळाले.

## निरोपावेळी पोलीस आयुक्त शिंदेंना हुंदका अनावर

सुराज्य/नाशिक

मावळते पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांच्या निरोप समारंभात अनेक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी शिंदे यांच्या कर्तव्यातील भूमिकेसह माणुसकी व वडिलकीच्या आठवणी मांडल्या. अखेरीस शिंदे हे व्यक्त होण्यास उभे राहिले अन् सहकाऱ्यांच्या भावनांनी गहिवरलेल्या आयुक्तांनी हुंदका दिला. काही वेळ डोळे मिटून शांत होत त्यांनी सभागृहात उपस्थित पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांसमोर मन मोकळं केलं. पण या प्रसंगामुळे सभागृहातील सारेच अधिकारी भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. मात्र हे गहिवरणे बदलीमुळे नव्हे तर नाशिकशी जुळलेल्या ऋणानुबंधामुळे निर्माण झाल्याचेही त्यांनी सांगितले.

पोलीस आयुक्तालयाच्या भीष्मराज बाम सभागृहात शुक्रवारी (दि. २४) सकाळी दहा वाजता आयुक्त अंकुश शिंदे यांचा निरोप समारंभ पार पडला. त्यावेळी पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, मोनिका राऊत, चंद्रकांत खांडवी आणि प्रशांत बच्छाव व्यासपीठावर होते. राज्य गुप्तवार्ता विभागाच्या अधीक्षक गीता चव्हाण



यांच्यासह शहर पोलीस दलातील सर्व सहायक आयुक्त व प्रभारी अधिकाऱ्यांसह अंमलदार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सांगतेवेळी पोलीस आयुक्तांच्या पत्नी नंदिनी शिंदे यांनाही सन्मानित करण्यात आले.

जनमानस

## आयुक्त साहेब, इकडे लक्ष देताल का?

सोबत छायाचित्र असलेली गाडी पोलीस विभागाची आहे असे त्याच्या स्टिकरवरून लक्षात येते. ही गाडी बरोबर माझ्या कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर लावण्यात आलेली होती व हे लिहीत असेपर्यंत आहे. या जागेचा पत्ता २०५, गोल्ड फिंच पेठ, किल्ला रोड, सोलापूर असा आहे. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रधान कार्याजवळ ही जागा आहे.

सोलापूर शहरवासीयांना वाहतुकीची शिस्त लावणाऱ्या आणि सार्वजनिक सुरक्षेचे कवच देणाऱ्या पोलीस विभागातील कर्मचाऱ्यांकडून असे वागणे अपेक्षित नाही. मी काही वेळ हॉर्न वाजून पहिला कोणी येतं का आणि त्यांना सांगावे की, बाबांनो अशी गाडी लावू नये. पण सुमारे पाच मिनिटाच्या कालावधीपर्यंत कोणी आलेले नाही. मला त्रासही झालेला आहे आणि मनस्तापही.

मा. पोलीस आयुक्त साहेब, जरा याची चौकशी केली तर बरे होईल. ज्या ठिकाणी ही गाडी लावण्यात आलेली आहे तो परिसर सार्वजनिक धुम्रपान करणाऱ्यांचा अड्डा झालेला आहे. याबाबतची रीतसर तक्रार मी आपल्या कार्यालयात केली होती. आपल्या लोकांनी हात झटकले. प्रकरण सोलापूर महानगरपालिकेकडे पाठवले. सोलापूर महानगरपालिकेनेही आपले हात झटकले. हे प्रकरण आपल्या कार्यालयाशी संबंधित आहे म्हणून आम्हाला कळवले.





आम्ही या शहरातील चार पुस्तक शिकलेले, सभ्य सुशिक्षित नागरिक आहोत. सोलापूर शहरात कार्यरत असलेल्या जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त आणि महानगरपालिका आयुक्तांकडून आमच्या काही प्राथमिक अपेक्षा आहेत.

पोलीस आयुक्त साहेब, कृपया याकडे लक्ष द्या. अशा पद्धतीने वाहने उभे करण्याचे काम कोणाचे आहे याचा तपास करा. ज्या परिक्षेत्रात हे वाहन उभे आहे, तेथल्या सार्वजनिक धूम्रपान क्षेत्रावर कारवाई करा. शहरातील एक सामान्य नागरिक म्हणून आपणास एवढीच हात जोडून विनंती आहे.

हो अजून एक सांगावयाचे राहिले. या गाडीचे पीयूसी प्रमाणपत्र नूतनीकरण झालेले दिसत नाही. पोलीस गाड्यांच्या बाबतीतच ही स्थिती असेल तर सर्वसामान्य जनतेच्या गाड्यावर कारवाई का? अगोदर संपूर्ण पोलीस विभागाच्या दुचाकी, चारचाकी गाड्यांचे पीव्हीसी प्रमाणपत्राचे नूतनीकरण करून घ्या. मग खुशाल अन्य वाहनांवर कारवाई करा. आमची तक्रार नाही.

**- श्रीनिवास माधवराव वैद्य, चार्टर्ड अकांउंटंट, सोलापूर.**

## संक्षिप्त वृत्त

### शिरोळवाडी येथे शेताला आग; दोन लाख रुपयांचे ऊस जळाले

**सोलापूर** : अज्ञात कारणावरून शेतात आग लावल्याने उसाचे पीक जळून २ लाखाचे नुकसान झाले. ही घटना शिरोळवाडी (अक्कलकोट) येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात अक्कलकोट उत्तरच्या पोलिसांनी अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात निनाद कैलास शहा (अक्कलकोट) यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. शुक्रवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अनोळखी इसमाने त्यांच्या शिरोळवाडी येथील शेतात आग लावली. उसाचे पीक जळून २ लाखाचे नुकसान झाले. त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा तपास हवालदार वाळके करीत आहेत.

### मोटारसायकलची धडक; उपचारादरम्यान एकाचा मृत्यू

**सोलापूर** : आसरा चौक येथे रस्त्या ओलांडून जात असताना भरधाव वेगाने आलेल्या मोटरसायकलने धडक दिल्याने एक जणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. फिर्यादी धुंडव्या काडव्या स्वामी (जानकीनगर) यांचे वडील काडव्या महालिंगय्या स्वामी हे दि. २३ नोव्हेंबर रोजी ७.३० वाजता आसरा चौक येथे रस्ता ओलांडून जात असताना भरधाव वेगात आलेल्या (एम.एच.१३ इ.बी.१७९४) रोहित कालकोटी याच्या ताब्यातील वाहनाने धडक दिल्याने फिर्यादीच्या वडिलांचे डोके डिव्हायडर आदळून ते गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. विजापूर नाका पोलीस ठाण्यात मोटरसायकलस्वार रोहित कालकोटी याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

### लोखंडी कोयत्याने मारहाण; पोलिसांत गुन्हा दाखल

**सोलापूर** : कोणत्यातरी अज्ञात कारणावरून लोखंडी कोयत्याने फिर्यादी विद्या संतोष गुरव (भूषणनगर) यांचा मुलगा समर्थ यास लोखंडी कोयत्याने पाठीवर मानेजवळ वार करून गंभीर जखमी केले. पट्ट्याने, लाथा बुक्क्यांनी मारहाण केली, निघून गेला. फिर्यादीचा मुलगा समर्थ आपल्या घरी असताना बॉबी, त्याच्या इतर मित्रांनी त्यास गंभीररित्या मारहाण केली. विजापूर नका पोलीस ठाण्यात बॉबी तळभंडारे, त्याच्यासोबत असलेल्या एका अनोळखी इसम असे दोघांवर गुन्हे दाखल झाले आहेत. तपास पोलीस निरीक्षक पोपळघट हे करत आहेत.




### मुलीची छेडछाड काढल्यावरून सळईने चटके देऊन मारहाण

**सोलापूर** : गोड बोलून घरातून बाहेर घेऊन जावून मुलीची छेड का काढतो, असे म्हणून मारहाण केल्याप्रकरणी गणेश, बबलू, बसू,विकास मालक व इतर दोन अनोळखी इसमांवर गुन्हा दाखल झाला. फिर्यादी बबलू श्रीनिवास संगा (माळीनगर) यास त्या संशयित आरोपीने घरी येऊन तुझ्याकडे काम आहे. असे म्हणून मोटरसायकलवर बसवून नेऊन मुलीची छेडछाड का काढतो, असे बोलून मारहाण केली.तापलेल्या सळईने फिर्यादीच्या डाव्या हाताला, पंजाला, कमरेला चटके दिले, दुखापत केली. एमआयडीसी पोलीस ठाण्यात सहाजणांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला. तपास सहायक पोलीस निरीक्षक कुकडे हे करत आहेत.

### अकलूज येथील फायनान्स कंपनीत दीड लाखांचा अपहार; कामगारावर गुन्हा

**अकलूज** : कर्जाने दिलेली रक्कम वसूल करून कंपनीत जमा न करता १ लाख ५१ हजार रुपयाचा अपहार केल्याची घटना अकलूज येथील आर्शिवाद मायक्रो फायनान्स कंपनीत घडल्याचे नुकतेच उघडकीस आले. या प्रकरणात अकलूजच्या पोलिसांनी अमित सतीश बसव (स्वरूपनगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या संदर्भात कंपनीचे व्यवस्थापक किरण सरवदे (अकलूज) यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. आरोपी अमीत आशीर्वाद फायनान्स कंपनीस एफडीओ या पदावर काम करीत होता. त्याच्याकडे ५९ केंद्राचे हप्ते गोळा करण्याचे काम होते. त्याने दि. ९ नोव्हेंबर रोजी काही रक्कम जमा केली. १ लाख ५० हजार ९४३ रुपयांचा अपहर केला. तपास हवालदार शेख करीत आहेत.

---

### अक्कलकोट अन्नछत्र मंडळाने पाच वर्षांपूर्वीच उभारणी केली; प्रस्ताव अद्यापही लालफितीत

# विश्रांती कक्ष, वाहनतळामुळे भाविकांची सोय

**सुराज्य/अक्कलकोट**

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने गेल्या पाच वर्षांपूर्वीच अद्यावत विश्रांती कक्ष आणि वाहनतळ उभा केल्याने दररोज शेकडो वाहनांची सोय झालेली आहे.

दरम्यान, जिल्ह्याच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या बैठक झाली. या बैठकीत अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना म्हणून तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी दररोज लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे वाहन चालकांसाठी विश्रांती कक्ष असावे, असा प्रस्ताव मांडण्यात आला होता. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी मांडलेल्या प्रस्तावाला माजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी त्यावेळी सकारात्मक प्रतिसाद दिला होता.




अक्कलकोटः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने पाच वर्षांपूर्वी उभारलेले अद्यावत विश्रांती कक्ष आणि वाहनतळाचे छायाचित्र. यामुळे वाहन धारक, भाविकांची मोठी गैरसोय दूर झाली आहे. वाहन चालकांना विश्रांती मिळणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट व पंढरपूर या तीर्थक्षेत्रामुळे दोन्ही ठिकाणी दररोज लाखो भाविक दर्शनासाठी येतात. भाविकांना या दोन्ही ठिकाणी घेऊन येणाऱ्या राज्य परिवहन मंडळाच्या चालक-वाहक, खासगी वाहन चालकांसाठी विश्रांती कक्ष असावे, असा प्रस्ताव जिल्ह्याच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या बैठकीत मांडण्यात आला होता. या प्रस्तावाचे कौतुक झाले. परंतु प्रत्यक्षात मात्र विश्रांती कक्षाचा विषय अद्यापही पूर्ण झाला नाही. सदरचा प्रस्ताव हा लालफितीत अडकला आहे. मात्र गरज ओळखून अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने विश्रांती कक्ष पाच वर्षांपूर्वीच उभारून सोय केली.

अक्कलकोट व पंढरपूर येथे दर्शनासाठी भाविक येतात. भाविकांचे दर्शन होईपर्यंत चालक त्या गाडीत झोपतात. पार्किंगच्या ठिकाणी विश्रांती कक्ष केल्यास भाविकांचे दर्शन होईपर्यंत चालकाला सुखकर विश्रांती मिळेल. त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी होईल. यासाठी हा प्रस्ताव मांडला होता.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाने गेल्या पाच वर्षांपूर्वीच अद्यावत विश्रांती कक्ष व वाहनतळ उभारले. नुकतेच न्यासाने घेतलेल्या जागेवर अद्यावत इतर वाहनांसाठी वाहनतळाचीदेखील व्यवस्था केलेली आहे.

---

## आयएमएसची सृष्टी कोणदे राज्यात प्रथम

### राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेसाठी निवड

**सुराज्य/सोलापूर**




विद्युत मंत्रालयातर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय शासकीय चित्रकला स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूल सीबीएसईच्या सातवीतील विद्यार्थिनी सृष्टी कोणदे हिने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिची नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात दि. ११ डिसेंबर रोजी होणाऱ्या राष्ट्रीय चित्रकला स्पर्धे साठी निवड झाली आहे. तिला हजार रुपये रोख रक्कम,शासकीय प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

ऊर्जा बचत संदेश, जनजागृती निर्माण करण्यासाठी या चित्रकला स्पर्धा राष्ट्रीय स्तरावर आयोजित केल्या जातात. शालेय स्तरावर प्रथम फेरीत आयोजित या स्पर्धेतून राज्यातील सर्व जिल्ह्यांमधून ५० विद्यार्थ्यांची निवड मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेसाठी निवड झाली. यातून सृष्टीने प्रथम क्रमांक प्राप्त केला असून, ती महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. ही स्पर्धा एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई येथे झाली. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ एनटीपीसीचे महानिदेशक अभय भाकरे, नोडल अधिकारी अमर प्रसाद, माजी कला संचालक, गो.गो. वाघमारे यांच्या हस्ते झाला.

तिचे संस्थापक अध्यक्ष ए.डी.जोशी, सचिव अमोल जोशी, सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला, ममता बसवंती, रुही काझी, नागेश वाघमोडे, सं.द.कुलकर्णी यांनी अभिनंदन केले. तिला कलाशिक्षक शैलेश कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.



दक्षिण सोलापूरः कारकल, औंज, मंद्रूपमधून भारत संकल्प यात्रेचा प्रारंभ झाला.

## कारकल, औंजमधून भारत संकल्प रथ यात्रेस प्रारंभ

**सुराज्य/द. सोलापूर**

पंतप्रधान यांच्या संकल्पनेतून भारत संकल्प यात्रा या अभियानाच्या अनुषंगाने संकल्प रथ यात्रेला दक्षिण सोलापूर तालुक्यातील कारकल, औज, मंद्रूप येथून सुरुवात झाली.

ही संकल्प भारत रथ यात्रा जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये जाणार आहे. या गावांमध्ये विविध विभागाचे कर्मचारी त्या-त्या ठिकाणी उपस्थित राहून गावकऱ्यांना मार्गदर्शन, विविध योजनांची माहिती देणार आहे. संकल्प रथामधील एलईडी प्रोजेक्टरमार्फत विविध योजनांचा प्रसार केला जाणार आहे. यावेळी केंद्रीय माहिती प्रसारण अधिकारी अंकुश चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशादीन शेळकंदे, गट विकास अधिकारी बी.डी.वाघ, तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी, केवीके शास्त्रज्ञ शास्त्री, बँकेचे प्रतिनिधी यांनी या संकल्प रथाचे स्वागत केले. आयुष्यमान भारत, रोहयो, शेततळे आदी योजनेतील लाभार्थ्यांना लाभांषाचे वाटप केले. यावेळी सरपंच सुजाता देशमुख, मल्लिकार्जुन करके, उपसरपंच सिद्धप्पा हंजगी, नागेश येळुरे उपस्थित होते.

---

### आ. समाधान आवताडे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

# नेत्र तपासणी शिबिरात १६६७ रुग्णांची तपासणी, चष्मे वाटप

**सुराज्य/मंगळवेढा**

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आ. समाधान आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. यावेळी मोफत नेत्र तपासणी, मोतिबिंदू तपासणी शिबीर आणि चष्मे वाटपाचा कार्यक्रम पार पडला.

नेत्ररोग तपासणी शिबिरामध्ये १६६७ रुग्णांची नेत्रतपासणी करून १२९३ रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप श्री संत दामाजी मंदिर समितीचे अध्यक्ष विष्णुपंत आवताडे यांच्या हस्ते केले. १८४ रुग्णांची मोतिबिंदू तपासणी करुन त्यापैकी ३४ मोतिबिंदू रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी अखिल भाविक वारकरी मंडळ महिला आघाडी जिल्हाध्यक्ष पार्वती आवताडे यांच्या उपस्थितीत नॅब हॉस्पिटल, मिरज येथे व्यवस्था करुन संबंधित रुग्णांना मोतिबिंदू नेत्र शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले.




मंगळवेढाः आ.समाधान आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित नेत्र, मोतिबिंदू तपासणी, चष्मे वाटप कार्यक्रमाच्या शुभारंभाप्रसंगी पार्वती आवताडे, संजय आवताडे, डॉ. सुहास माने, गणेश इंदूरकर, मनोज भायगुडे आदी मान्यवर.

या कार्यक्रमांचा शुभारंभ आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज् प्रायव्हेट लिमिटेडचे चेअरमन तथा नामवंत उद्योगपती संजय आवताडे यांच्या हस्ते केले.

यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक गणेश इंदूरकर, मनोज भायगुडे, निखील तोष्णीवाल, निनाद नागणे, लक्ष्मीकांत मर्दा, नंदकुमार शिंदे, भूलरोग तज्ज्ञ जाधव, नॅब हॉस्पिटलचे डॉ. प्रशांत मनोरकर, अनिल यादव, अक्षय ठेंगील, नेत्र चिकित्सा अधिकारी एल. आर. खांडेकर, किरण बोराडे, श्रीकांत कल्याणी, अनिल खटके, एम.व्ही. हिरेमठ, प्रमोदकुमार म्हमाणे, सी.टी.पवार, शहाजन मुलाणी, सर्जे, राऊत, जाधव, कोळेकर, महिला हॉस्पिटल मंगळवेढा येथील स्टाफ यांचे यांचे सहकार्य लाभले.

यावेळी सोमनाथ आवताडे, प्रदीप खांडेकर, शशिकांत चव्हाण, सरोज काझी, दत्तात्रय जमदाडे, निला आटकळे, जगन्नाथ रेवे, संतोष मोगले, चंद्रकांत पडवळे, कैलास कोळी, सुरेश भाकरे, भारत निकम, लक्ष्मण जगताप, राजन पाटील, बापूराव काकेकर, विजय माने, युवराज शिंदे, दादासाहेब ओमणे, खंडू खंदारे, विनायकराव यादव, शिवाजी सरगर, दिगंबर यादव, सचिन शिंदे, सिद्धेश्वर दत्तू, रमेश टाकणे, सत्यजीत सुरवसे, सुहास पवार, आनंद मुंढे, सुदर्शन यादव, जनार्दन डोरले, श्याम पवार, अशोक लेंडवे, परमेश्वर पाटील, सतीश मोहिते, संजय माळी, पप्पू वाडेकर, सुरेश मेटकरी, शिवाजीराव वाकडे, नागेश डोंगरे, दादासाहेब डोंगरे, सुशांत हजारे, अतुल मुरडे, चंद्रकांत गरंडे, विकास पुजारी, गंगाधर काकणकी, साहेबराव उगाडे, उमेश आवताडे, डॉ. सुभाष तानगावडे, बिरा लवटे, नागेश मासाळ, प्रकाश भोसले, सुधीर करंदीरकर उपस्थित होते.

---

# स्वामी समर्थ पालखी परिक्रमेस प्रारंभ

**सुराज्य/अक्कलकोट**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची पालखी परिक्रमा मोठ्या उत्साहात तीर्थक्षेत्र अक्कलकोटातून शनिवारी प्रस्थान झाली.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २६ वर्षांपासून न्यासाकडून श्री स्वामी समर्थ पालखी परिक्रमा काढण्यात येत आहे, यंदाचे २७ वे वर्ष आहे.

याचा शुभारंभ पुरोहित मंदार मोहनराव पुजारी, प.पू अण्णू महाराज पुजारी, धनंजय पुजारी, नीलम सामंत, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री स्वामी समर्थ पादुकांच्या पूजनाने झाला.



### अबालवृद्ध, महिला भक्तांना होणार लाभ

न्यासाच्यावतीने अनंतकोटी ब्रम्हांड नायक अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखी-पादुकांचे दर्शन, सेवा संपूर्ण महाराष्ट्रातील गावोगाव असलेल्या स्वामी भक्तांना करता यावे, यासाठी श्री स्वामींच्या पालखी परिक्रमेचे आयोजन केले आहे. दूरवर राहणारे अबाल वृद्ध, महिला स्वामी भक्तांना श्रींच्या दर्शनास्तव इच्छा असूनही स्वामींच्या मूळ स्थानी अक्कलकोट येथे येणे शक्य नसल्याने त्यांच्यासाठी श्रींचे दर्शन देण्यासाठी व त्यांची सेवा घेण्यासाठी श्री स्वामीच त्यांच्या गावी येत आहेत.

### पालखी परिक्रमेसाठी सहा महिन्यांचा कालावधी लागणार

गेल्या २६ वर्षापासून न्यासाकडून श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा काढण्यात येते. याकाळात सुमारे १८३ दिवसांमध्ये १० हजार किमीचा प्रवास सुमारे ५०० गावे महाराष्ट्रातील ३५ जिल्हे व ७५ तालुक्यातून कर्नाटक राज्यातील बेळगाव येथे मुक्काम होईल. गोवा राज्यातील २ जिल्ह्यात पालखीचा मुक्काम असतो. बृहन् मुंबई, ठाणे, वसई-विरार, कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, रायगड, ठाणे, नाशिक धुळे, नंदुरबार, जळगाव, संभाजीनगर, जालना, बुलढाणा, अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा, यवतमाळ, वाशीम, नांदेड, अहमदनगर, धाराशीव, बीड, लातूर या जिल्ह्यातून परिक्रमा होणार आहे. विशेष म्हणजे कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, केरळ राज्यासह गडचिरोली शहर, परदेशातूनदेखील मागणी होत आहे. पालखी परिक्रमेच्या अधिक माहितीसाठी मुख्य संयोजक संतोष भोसले (९८२२८१०९६६, ८५५८८५५६७५) यांना संपर्क करण्याचे आवाहन न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी केले आहे. सदर पालखी परिक्रमा ही ६ महिने महाराष्ट्रसह कर्नाटक, गोवा राज्यासह दि. १२ जून २०२४ रोजी तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत विसावणार आहे.

### न्यासाकडून सर्वोतोपरी सहकार्य

श्री स्वामींच्या मूळस्थान श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे श्री स्वामींच्या इच्छानेच श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट), स्थापन झाले आहे. येथे दैनंदिन दोन्ही वेळेस हजारोंच्या संख्येने स्वामी भक्त महाप्रसादाचा लाभ घेतात. अन्नछत्रतर्फे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडाविषयक, आपदग्रस्तांना मदत, आरोग्य विषयक इतर विविध कार्याक्रम्र राबविले जातात तसेच शासनाच्या विविध उपक्रमांना हे न्यास वेळोवेळी सर्वोतोपरी सहकार्य करीत असते.

### ५० कोटी रुपये खर्चून मोठा प्रकल्प उभारला

मंडळाच्या मालकीच्या जागेत यात्री निवास, यात्री भुवन, अतिथी निवास या निवासी या निवासी इमारती कार्यरत असून महाप्रसाद गृह, ध्यान धारणा मंदिर, मंगल कार्यालय आदी सुमारे ५० कोटी खर्चाचा मोठा प्रकल्प उभा राहत आहे. न्यासाच्या परिसरात सध्या स्वामी भक्तांच्या सेवेत तात्पुरत्या महाप्रसाद गृह बरोबरच श्री शमी विघ्नेश गणेश मंदिर (नवसाचा गणपती), नियोजित महाप्रसाद गृह इमारत स्टकचर, कपिला गाय, उभी स्वामी मूर्ती, कारंजा, शिवस्मारक, इनडोर-औटडोर जिम, प्रशस्त वाहन तळ, बालोध्यान शिवचरित्र प्रदर्शन हॉल, अग्निशामक, रुग्णवाहिका, राज्य परिवाहन महामंडळाच्या चालक व वाहकांनासाठी अद्यावत राहण्याची सोय, सौर ऊर्जा प्रकल्प, विविध दिन उत्सव, पौर्णिमा, चतुर्थी, एकादशी आदी कार्यक्रम न्यास साजरा करते.

यावेळी अभय खोबरे, श्यामराव मोरे, संजय राठोड, भाऊ कापसे, राजेंद्र लिंबितोटे, सुरेशचंद्र सुर्यवंशी, लक्ष्मण पाटील, संतोष भोसले, मनोज निकम, अ‍ॅड. संतोष खोबरे, अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, सोमकांत कुलकर्णी, श्रीकांत झिपरे, सिद्धाराम कल्याणी, शरणप्पा अचलेर, रामचंद्र घाडगे, अप्पा हंचाटे, बाळासाहेब मोरे, अविनाश मडिखांबे, अशोक जाधव, लखन सुरवसे, सैदप्पा इंगळे, अशोक किणीकर, केदार तोडक आदी उपस्थित होते..

## संक्षिप्त वृत्त



**सोलापूर :** सुरवसे कुटुंबियांना मदत पाच लाखांचा धनादेश देताना डॉ.पृथ्वीराज माने व इतर.

### 'सिद्धनाथ'च्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयास पाच लाखांची मदत


**सोलापूर :** सिद्धनाथ साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना वैयक्तिक विमा संरक्षण दिल्यामुळे सुरवसे कुटुंबीयांना पाच लाखाची मदत करता आली. याचे समाधान असल्याचे कारखान्याचे उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने यांनी सांगितले. तिऱ्हे येथील सिद्धनाथ कारखान्याचे पाथरी येथील कर्मचारी प्रल्हाद बाबू सुरवसे यांचे अपघाती निधन झाले. कारखान्याने कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक विमा उतरला असल्यामुळे विमा कंपनीचे वतीने मयताचे वारसास पाच लाखांची विमा रक्कम कारखान्याचे नावे मिळाली. धनादेश मृत कर्मचारी प्रल्हाद यांची पत्नी प्रणिता सुरवसे यांना कारखान्याचे उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी धनंजय भोसले, विनोद पाटील, बाळासाहेब काळे, धुळा शेंबडे, धनंजय पाटील, सुहास भोसले, रामचंद्र वाकडे, माळप्पा बंडगर, उद्धव बंडगर, दत्ता सुरवसे उपस्थित होते.



**सोलापूर :** कार्तिकी एकदशीनिमित्त गोविंद ग्रुपतर्फे दीपोत्सव साजरा करण्यात आला.

### कार्तिकी एकादशीनिमित्त गोविंद ग्रुपतर्फे दीपोत्सव

**सांगोला :** गोविंद महिला ग्रुपतर्फे कार्तिकी एकादशीचे औचित्य साधून शहरातील देशपांडे गल्ली येथील विठ्ठल मंदिरात दीपोत्सव आयोजित केला होता. सायंकाळच्या सुमारास महिलांनी आयोजित केलेला दीपोत्सव अतिशय नयनरम्य व देखणा होता. यावेळी श्री विष्णू सहस्त्रनाम पठण व भक्तीगीत सादर करण्यात आले. सदर आनंदोत्सव पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.



**सोलापूर :** उमाकांत गायकवाड यांचे अभिनंदन करताना महेश गादेकर, अजिकुमार संगवे.

### महाराष्ट्र किशोर खो-खो संघाच्या सहाय्यक प्रशिक्षकपदी गायकवाड

**सोलापूर :** सोलापूर ॲम्युचर असोसिएशनचे व उत्कर्ष क्रीडा मंडळाचे प्रशिक्षक उमाकांत गायकवाड यांची महाराष्ट्र किशोर खोखो संघाच्या सहाय्यक प्रशिक्षकपदी निवड झाली असल्याचे म हाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस ॲड. गोविंद शर्मा यांनी कळविले आहे. ते सोलापूर म्युचर खो-खो असोसिएशनचे तांत्रिक समिती सचिव आहेत. त्यांनी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या प्रशिक्षकांच्या प्रशिक्षण शिबिरात भाग घेतला होता. त्यांच्या निवडीबद्दल असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर, सरचिटणीस ए. बी. संगवे आणि सर्व पदाधिकारी व सदस्यांनी अभिनंदन केले. ३३ वी किशोर किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा १३ ते १७ डिसेंबर या कालावधीत कर्नाटकात होणार आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्राचे किशोर व किशोरी संघ भाग घेणार आहेत. महाराष्ट्राच्या दोन्ही संघांचे स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिर ४ डिसेंबरपासून चिंचणी, पालघर येथे आयोजित करण्यात आले आहे. तेथे व स्पर्धेत ते महाराष्ट्राच्या किशोर संघास मार्गदर्शन करतील.



### संतपीठात तुळशीविवाह उत्साहात साजरा

**चिखली :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये तुळशीविवाह सोहळा उत्साहात पार पडला. तुळशी विवाहासाठी शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारापासून पारंपारिक पद्धतीने प्रतिकात्मक मिरवणूक काढण्यात आली. मुख्य दरवाज्यापासून वारकरी वेषभुषेतील विद्यार्थ्यांनी टाळ, मृदुगांच्या गजरात ढोलताशांच्या आवाजात सभागृहापर्यंत मिरवणूक आणण्यात आली. तुळस व श्रीकृष्णाच्या मूर्तीचे विधिवत पूजन करून विवाह सोहळा संपन्न झाला. या विवाह सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून राजू ढोरे, अभय टिळक, संचालिका डॉ. स्वाती मुळे, प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे, मुख्याध्यापिका स्नेहल पगार, समन्वयिका मयुरी मुळुक उपस्थित होते.

# यंदाची कार्तिकी वारी ठरली स्वच्छतेची वारी

## जिल्हाधिकारी आशीर्वाद; दररोज ७० ते १०० टन कचरा उचलला; १३०० सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**सुराज्य/सोलापूर**

कार्तिकी शुद्ध एकादशीनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपत्नीक शासकीय महापूजा केली. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांना दर्जेदार स्वच्छतेचा सुविधा देवून यंदाची वारी ही स्वच्छतेची वारी ठरली आहे.

जिल्हा प्रशासन प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सुरुवातीपासूनच पंढरपूर शहर यात्रा कालावधीत स्वच्छ राहावे यासाठी स्थानिक प्रशासन व मंदिर समितीच्या वतीने देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. मंदिर परिसर व दर्शन रांगेमध्ये स्वच्छतेला प्राधान्य देऊन वेळोवेळी स्वच्छता करण्यासाठी मंदिर समितीच्या वतीने १३०० सफाई कर्मचारी नियुक्त करण्यात आले.

यामध्ये प्रमुख्याने ६५ एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी, पत्राशेड, गोपाळपुर रोड, मंदिर परिसर या ठिकाणी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार असल्याने या ठिकाणी स्वच्छता अधिक चांगले कशा पद्धतीने राहील याबाबत नगरपरिषद व मंदिर समितीला काटेकोरपणे नियोजन करण्याचे निर्देश दिलेले होते त्यानुसार शेकडो कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून वेळोवेळी साफसफाई करून या ठिकाणासह संपूर्ण शहरात स्वच्छता राखण्याबाबत चांगले प्रयत्न करण्यात आले.

शहरात सुलभ शौचालय, नगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेले कायमस्वरूपी शौचालय व मुख्य गर्दीच्या ठिकाणी, मंदिराकडे प्रवेश करणाऱ्या मुख्य रस्त्यावर तात्पुरती शौचालय ठेवण्यात आली. या सर्व शौचालयाच्या ठिकाणी नगर परिषदेच्या वतीने मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध करून देण्यात आले. त्याप्रमाणेच हे शौचालय भरल्यानंतर त्यातून मैला उचलून घेऊन जाण्यासाठी नगरपालिकेने वाहनाची व्यवस्था ठेवलेली होती. तसेच प्रत्येक शौचालयाच्या ठिकाणी साफसफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याने वेळोवेळी शौचालये स्वच्छ केली जात असल्याने खूप चांगल्या प्रकारे स्वच्छता झालेली दिसून येत आहे. येथे आलेल्या भाविकांना अशा प्रकारचे स्वच्छ मुबलक पाण्यासह २ हजार ६११ शौचालये उपलब्ध झाल्याने भाविकांनी या शौचालयाचा मोठ्या प्रमाणात वापर केला.

कार्तिकी एकादशीच्या रात्रीपासुनच २४ तास स्वच्छता व कचरा गोळा करण्याचे काम हाती घेतले असुन याकामी शहरासह ६५ एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर आदी ठिकाणच्या स्वच्छतेसाठी १३०० स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून, यामध्ये ३५० कायम तर ९५० हंगामी कर्मचारी तसेच इतर नगर पालिकेकडून ही स्वच्छतेसाठी कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत.



६५ एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर आदी ठिकाणी जंतुनाशक फवारणीसह, मँलेथॉन पावडर, ब्लिचिंग पावडर नगरपालिकेच्या वतीने वेळोवेळी टाकण्यात येत आहे. . प्रशासनाने दर्शन रांगेत होणारी घुसखोरी थांबवण्यासाठी यावर्षी चांगली उपायोजना केलेली होती. दर्शन रांगेत श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी तासनतास थांबलेल्या भाविकासमोर अन्य भाविकांनी घुसखोरी करू नये म्हणून ठीक ठिकाणी होऊ डबल बॅरिकेडींग केलेले होते. अशा ठिकाणी पोलिसा सोबतच मंदिर प्रशासनाचे कर्मचारी नियुक्त केलेले होते, जे पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली काम करत होते. त्यामुळे यावर्षीच्या कार्तिकी यात्रेत कोठेही दर्शन रांगेत घुसखोरी झालेली नाही. दर्शनासाठी लागणारा कालावधी ही यामुळे कमी झाला असल्याने वारकरी, भाविक यांच्याकडून समाधान व्यक्त होत आहे.

### पूर्वीपेक्षा खूपच चांगली स्वच्छता

यावर्षीच्या कार्तिकी वारीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेण्यासाठी आम्ही पंढरपूर शहरात एसटीने आलो. एसटी स्टँड पासून ते मंदिर परिसर, वाळवंट घाट नामदेव पायरी व शहरात विविध ठिकाणी आम्ही फिरलो. सर्व ठिकाणी स्वच्छतेची चांगली व्यवस्था केलेली होती. दर्शन रांगेत ही स्वच्छतेला प्राधान्य दिल्याचे दिसून येत होते. तसेच चहापाणी, नाश्ता सर्व सुविधा उपलब्ध केलेल्या होत्या. पोलिसांचा बंदोबस्त ही ठिकठिकाणी दिसून येत होता. विशेष म्हणजे शौचालयाच्या ठिकाणी मुबलक पाणी होते व सफाई कर्मचारीही होते व शौचालयाची स्वच्छता ही पूर्वीपेक्षा खूपच चांगली होती व पुढे येणाऱ्या सर्व वाऱ्यामध्येही अशीच स्वच्छता राहावी अशी अपेक्षा व्यक्त करून प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधा बद्दल समाधान आहे.

**-महादेव दुधभाते, भाविक, सोलापूर**

# वैष्णवी देवी प्राण प्रतिष्ठापनेनिमित्त मूर्तींची मिरवणूक

**सुराज्य/सोलापूर**

शहरातील जुना विडी घरकुल भागातील प्रियदर्शिनी नगर येथील ओम वैष्णवी देवी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ओम वैष्णवी देवी पुन: प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत जलकुंभधारी ७०० महिला, २५० तरुण-तरुणींचा लेझीम पथक, ढोलपथक सहभागी झाले होते.

प्राणप्रतिष्ठाना सोहळा बुधवार, २२ नोव्हेंबरपासून सुरू झाला आहे. त्यानिमित्त देवींची मूळ मूर्ती व उत्सवमूर्ती मूर्ती तसेच काल भैरवनाथांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये ७०० महिला जलकुंभ डोक्यावर घेऊन सहभागी झाल्या होत्या. २५० तरुण-तरुणींनी लेझीमचा ठेका धरला होता. फलटण येथील रूद्रावतार ढोल पथकाच्या ढोलवादकांचा जोषपूर्ण वातावरणात सहभाग होता. तसेच विविध प्रकारच्या मोठमोठ्या बाहुलींचे खेळही सादर करण्यात आले. ही मिरवणूक दाजी पेठ, पद्मशाली चौक, दत्तनगर, पाणीटाकी, कविता नगर, २५६ गाळा, गोंधळी वस्ती, रंगराज नगर, सागर चौक, महालक्ष्मी चौक, एलआयजी प्लॉट, प्रगती चौक, हिरामोती चौक, लक्ष्मी बँक ते देवस्थानपर्यंत निघाली. मिरवणुकीचे ठिकठिकाणी औक्षण करून स्वागत केले. मिरवणूक यशस्वी करण्यासाठी ओम वैष्णवी देवी चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकाऱ्यांनी रपरिश्रम घेतले.



**सोलापूर :** ओम वैष्णवी देवी पुन: प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रमात मूर्तींची मिरवणूक काढण्यात आली.

# बीएमआयटी-बीएमपीचा माजी विद्यार्थी मेळावा

**सोलापूर :** ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (बिएमआयटी) व ब्रह्मदेवदादा माने पॉलिटेक्निक (बिएमपी) च्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा शनिवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२३ रोजी 'हॉटेल धनश्री, विजापूर रोड जुळे ' याठिकाणी सायंकाळी ५ ते ९:३० या वेळेत आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा राहुल माने, उपप्राचार्य प्रा एस जी कुलकर्णी, प्राचार्य प्रा श्रीकांत जोशी, आनंद गजुळ, दत्तात्रय मलखारे, संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत झाले. याप्रसंगी १७९ माजी विद्यार्थी उपस्थित होते. प्रा राहुल माने यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे संस्थेकडून स्वागत केले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष दिलीप माने, उपाध्यक्ष पृथ्वीराज माने, सचिवा जयश्री माने, विश्वस्त स्नेहल माने समूह संचालक प्रा. आर वाय माने यांचे मार्गदर्शन लाभले. मेळावा आयोजन करण्यासाठी डॉ. साहेबगौडा, बीएमआयटी बिएमपी सर्व विभागप्रमुख, शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

# पंढरपूर रनर्स असोसिएशनतर्फे फन रन वॉकचे आयोजन

**सुराज्य/पंढरपूर**

पंढरपूर रनर्स असोसिएशनतर्फे फन रन वॉकचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या या फन रन मध्ये अध्यक्ष भारत ढोबळे,सचिव बालाजी शिंदे, आयर्न मॅन डॉ. चंद्रकांत मगर, डॉ.संजय सरडे, डॉ. श्री व सौ. पाटील, माधुरी माने, दिलीप कोरके, आनंद कुलकर्णी, प्रताप देवकर,सारंग कुंभार, संतोष कवडे,अभिजीत सरडे,भाऊसाहेब औसेकर, ताहीर खान, अमित देशमुख, आप्पा खरात, सोमेश गानमोटे, काझी व ढवळे, महेश भोसले यांनी सहभाग घेतला.

या संस्थेची स्थापना २५ नोव्हेंबर २०१९ रोजी रोजी झाली. शहरातील अनेक रनर्स, व्यायाम प्रेमी इतर शहरांमध्ये धावण्यासाठी मॅरेथॉन मध्ये सहभाग घेत असत. वेगवेगळ्या शहरात जाऊन मॅरेथॉनमध्ये भाग घेतो तसं आपल्या शहरातील सर्व लोकांनी एकत्र येऊन मॅराथान करावी व आपलं आरोग्य चांगले, निरोगी ठेवावे ही भावना घेऊन. रनर्स असोसिएशन पंढरपूरची स्थापना केली.




**पंढरपूर :** पंढरपूर रनर्स असोसिएशनतर्फे फन रन वॉकचे आयोजन करण्यात आले होते.

रनची सुरवात रेल्वे मैदान, स्टेशन रोड, चौफाळा,विठ्ठल रुक्मिणी मंदिर प्रदक्षिणा घेऊन परत छत्रपती शिवाजी महाराज चौक ते रेल्वे मैदान असे रन वॉक करून पूर्ण करण्यात आले. यावर्षीच्या फेब्रुवारी महिन्यातील पहिल्या रविवारी या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याची सुरुवात आज पासून झाली आहे असे अध्यक्ष भारत ढोबळे यांनी जाहीर केले. बालाजी शिंदे -पाटील यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सदस्य पदाधिकारी यांची मोलाची साथ मिळाली.

# सार्थस्तुती ग्रंथाचे प्रकाशन

**सुराज्य/पंढरपूर**

येथील ह.भ.प. लक्ष्मण चव्हाण महाराज लिखित 'श्री निळोबा स्वामीकृत सद्गुरू तुकाराम महाराजांची सार्थ स्तुती' या ग्रंथाचे कार्तिक शुद्ध एकादशी दिवशी प्रकाशन झाले.

संत तुकाराम महाराजांचे विद्यमान वंशज ह.भ.प. कान्होबा महाराज देहूकर व श्रीगुरू बापूसाहेब सोपानकाका देहूकर महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यातआणि जगद्गुरु द्वाराचार्य डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर यांच्या अध्यक्षतेखाली या विशेष ग्रंथाचे प्रकाशन झाल्याचे जटायु अक्षरसेवाचे सुजय निकते यांनी सांगितले.

पंढरपूर येथील श्रीगुरू कान्होबा व श्रीगुरू बापूसाहेब देहूकर फडावर झालेल्या या प्रकाशन सोहळ्यात बोलताना जगद्गुरु द्वाराचार्य डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर म्हणाले, महाराष्ट्राची लोकसंस्कृती व लोकपरंपरा ज्या वारकरी संप्रदायामध्ये सामावलेली आहे; त्या अपूर्व परंपरेचे थोर उपासक व संतसाहित्य वेदांत तत्त्वज्ञानाचे अभ्यासक ह.भ.प. श्री. वेदान्ताचार्य प.पू. लक्ष्मणजी महाराज चव्हाण यांच्या सिद्धप्रज्ञेतून व प्रासादिक लेखणीतून साकारलेले संत निळोबारायकृत स्तुती प्रकरणावरील विवरण ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाले. हे वारकरी संप्रदायाच्या दृष्टिकोनातून अतिशय महनीय कार्य संपन्न झाले आहे.

यावेळी बोलताना श्रीगुरू बापूसाहेब सोपानकाका देहूकर महाराज म्हणाले, या ग्रंथाचे विवरण ह.भ.प. श्री. लक्ष्मण महाराज चव्हाण यांनी केले. या ग्रंथाचे प्रकाशन होत आहे, याचा मनस्वी आनंद झाला. सूत्रसंचालन ॲड. चौगुले यांनी केले. या प्रकाशन सोहळयास वारकरी सांप्रदायातील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# त्रिपुरारी पौर्णिमा : आज विविध मंदिरात दीपोत्सव

## मंदिर परिसर उजळणार ; कार्तिक पौर्णिमेनिमित्त महापरित्राणपाठाचे आयोजन

**सुराज्य/सोलापूर**

रविवार दिनांक २६ नोव्हेंबर रोजी त्रिपुरारी पौर्णिमा आहे. त्रिपुरारी पैर्णिमेनिमित्त शहरातील विविध मंदिरात दीपोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील महिला भक्तांनी दीपोत्सव कार्यकमात सहभागी होवून सायंकाळी मंदिरात दीप लावावे, असे आवाहन शहरातील मंदिर समितीच्यावतीने करण्यात आले.

शहरातील रुपा भवानी मंदिर, बनशंकरी देवी, मोदी येथील अष्टभूजा मंदिर, विमानतळमधील लक्ष्मी मंदिर, मजरेवाडी येथील सदानंदी माता मंदिर, साखर पेठेतील हिंगुलांबिका मंदिर, सोलापूरचे ग्रामदैवत सिध्देश्वर महाराज मंदिर, जुने विठ्ठल मंदिर, गणपती घाट, चौपाड विठ्ठल मंदिर, अशोक चौकातील लक्ष्मी मंदिर अशा विविध मंदिरात आज दीपोत्सव पार पडणार आहे. दीपोत्सवाच्या कार्याक्रमानिमित्त येणाऱ्या महिला भक्तांसाठी दीप लावण्याची व्यवस्था मंदिरात करण्यात येत आहे. विविधि मंदिरातील दीपमाळाची साफसफाई व स्वच्छता करण्यात आली आहे.

२६ तारखेला सायंकाळी साखर पेठेतील बनशंकर देवीच्या मंदिरात मोठया संख्येने महिला जमतात. प्रत्येक महिला मनातील संकल्पना करुन दीपोत्सव करुन नमस्कार करत असते. दीपोत्सवाच्या कार्यक्रमात दरवर्षी महिलांची गर्दी लक्षणीय असते. यंदाच्या वर्षीदेखील दीड ते दोन हजार दिवे लावले जातील, असे मंडळाचे विजयकुमार ज्योती यांनी सांगितले.

### महापरित्राणपाठाचे आयोजन


कार्तिक पौर्णिमेनिमित्त रविवार दि. २६ नोव्हेंबर रोजी रात्री १२ पासून अर्थात सोमवारी सकाळी ६:०० वाजता सूर्योदयापर्यंत उपासकांसाठी महापरित्राणपाठाचे आयोजन करण्यात आले आहे. पुजनिय भंन्तेजी महास्थवीर एस. परमशांती यांच्या शुभ हस्ते श्रीलंकेवरुन आणून रोपीत केलेल्या ऐतिहासिक बोधीवृक्षाखाली म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल, जुना एम्प्लॉयमेंट चौक येथील बोधीवृक्षाखाली बसण्यासाठी आसनव्यवस्था, रात्री २ वेळा चहा व सकाळी नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली आहे. उपासकांसानी रविवारी रात्री ११:३० वाजेपर्यंत महापरित्राणपाठाच्या ठिकाणी वेळेवर यावे, सर्वांनी शुभ्र पांढरे कपडे घालून यायचे आहेत. महापरित्राणपाठासाठी प्रवेश विनामूल्य आहे, परंतु मर्यादित आसनव्यवस्था असल्याने पूर्व नांवनोंदणी आवश्यक आहे. नावनोंदणीसाठी ॲड. रवी गजधाने ७०२०००२६०८ यांच्याकडे संपर्क साधावा.



### त्रिपुराररी पौर्णिमेसंबंधी कथा

त्रिपुर नावाचा एक राक्षस होता. त्याने तीर्थक्षेत्री मोठी तपश्चर्या केली आणि ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले. ब्रह्मदेवाने प्रसन्न होऊन वर माग' असे सांगितले, त्रिपुराने देवता, मनुष्य, निशाचर, स्त्री किंवा रोग यांच्यापासून मला मृत्यू न येऊ दे आणि त्यांच्यापासून अभय मिळावे, असा वर मागितला. ब्रह्मदेवाने त्यावर तथास्तु' म्हटले. ब्रह्मदेवाच्या या वरामुळे त्रिपुरासुर भलताच माजला. त्याची तीन पुरे होती. ती आकाशसंचारी होती. त्रिपुर त्या पुरात बसून त्रैलोक्याला त्रास देऊ लागला. त्याच्या त्रासामुळे सर्व देव वैतागले आणि भगवान शंकराला शरण गेले. भगवान शंकरानी त्याची तीन आकाशसंचारी पुरे जाळून टाकली आणि त्रिपुरासुराला ठार मारले. ही घटना कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी प्रदोषकाली घडली.

## संक्षिप्त वृत्त



अक्कलकोटः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातर्फे रवींद्र जोशी यांचा सन्मान करताना अमोलराजे भोसले यांच्यासह उपस्थित मान्यवर.

### स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातर्फे न्यायमुर्ती रवींद्र जोशी यांचा सन्मान

**अक्कलकोट** : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातर्फेमुंबई उच्च न्यायालय, संभाजीनगर खंड पिठाचे न्यायमुर्ती रवींद्र जोशी यांचा सन्मान करण्यात आला. ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला. यावेळी अक्कलकोटचे न्यायाधीश आर.एम. शेख, स्वप्नील मोरे, अविनाश सुरवसे, पो.कॉ. संतोष वाघमारे, अभय खोबरे, श्यामराव मोरे, भाऊ कापसे, मनोज निकम, अतिश पवार, ज्ञानेश्वर भोसले, एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, धानप्पा उमदी, बाळासाहेब घाडगे, अमित थोरात, प्रशांत साठे, निखील पाटील, प्रवीण घाटगे, गोटू माने, दत्ता माने, शिवराज स्वामी, महांतेश स्वामी, रुद्रय्या स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, कल्याण देशमुख, शावरप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनूर उपस्थित होते.

### महूद बृहत सोसायटी चेअरमनपदी येडगे व्हाईस चेअरमनपदी देशमुख बिनविरोध

**सांगोला** : महूद (सांगोला) येथील शेतकरी कामगार पक्षाचे वर्षानुवर्षे वर्चस्व असलेल्या महूद बृहत विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी शेकापच्या अंजना केशव येडगे यांची तर व्हाईस चेअरमनपदी शेकापचे संतोष शशिकांत देशमुख यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीनंतर शेकापच्या कार्यकर्त्यांनी गुलालाची मुक्त उधळण करीत फटाके फोडून जल्लोष केला. यावेळी पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते नूतन चेअरमन अंजना येडगे आणि व्हाईस चेअरमन संतोष देशमुख यांचा सत्कार केला. महूद बृहत विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन शिवाजी कोळेकर, व्हाईस चेअरमन दत्तात्रय डोंगरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. दरम्यान संस्थेच्या कार्यालयात अध्यासी अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अमर गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली चेअरमन, व्हाईस चेअरमनपदाच्या निवडीसाठी संचालक मंडळाची बैठक बोलवली. यावेळी चेअरमन पदासाठी अंजना येडगे तर व्हाईस चेअरमनपदासाठी संतोष देशमुख यांचे एकमेव अर्ज आल्याने दोघांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

### दामाजी कारखान्याचा पहिला हप्ता २७०१ रुपयांप्रमाणे देणार : पाटील

**मंगळवेढा** : श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२३-२४ हंगामाकरिता ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना प्रती मेट्रीक टन २७०१ रुपयांप्रमाणे पहिला हप्ता देणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील यांनी दिली. संचालक मंडळ सभेत २७०१ रुपयांप्रमाणे पहिला हप्ता देण्याचा निर्णय घेतला. दामाजी कारखान्यावर कोणत्याही प्रकारचा उपपदार्थ निर्मिती प्रकल्प नसतानाही ऊस उत्पादक शेतक-यांच्या हितासाठी प्रति मेट्रीक टन २७०१ रुपयांप्रमाणे पहिला हप्ता जाहीर केला आहे. दामाजी कारखान्यावर ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांचा विश्वास असल्याने कारखान्याचे गाळप पूर्ण क्षमतेने चालू आहे. तरी शेतक-यांनी आपला ऊस संत दामाजी कारखान्यास गळीतास पाठवुन कारखान्याच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी व्हाईस चेअरमन तानाजी खरात, मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणूकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, प्रभारी कार्यकारी संचालक रमेश जायभाय, कृष्णात ठवरे, परमेश्वर आसबे, रमेश गणेशकर आदी उपस्थित होते.

### शॉर्ट सर्किटमुळे शेतकऱ्याचे दोन लाख रुपयांचे नुकसान

**सांगोला** : वीज मंडळाच्या मेनलाईट तारामध्ये शॉर्ट सर्किट होऊन तुटलेल्या तारा उसाच्या पिकात पडून शेतातील दोन एकर उसासह ठिंबक सिंचने पाईप जळून खाक झाल्याने शेतकऱ्यांचे सुमारे २ लाख रुपयांचे नुकसान झाले. ही घटना गुरुवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास हलदहिवडी (सांगोला) येथे घडली. याबाबत, शेतकरी महादेव प्रल्हाद चव्हाण यांनी पोलिसात खबर दिली आहे. फिर्यादी महादेव चव्हाण यांचे हलदहिवडी येथील शेती गट नंबर-३५४/१० मध्ये दोन एकर उसाचे पीक आहे. त्या उसावरून महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या तारा गेल्या आहेत. गुरुवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास अचानक मेनलाईटच्या तारामध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने तारा तुटून उसाच्या पिकात पडल्या. ऊसाने पेट घेतला. या आगीत २ एकर उसासह त्यातील ठिंबक सिंचनचे पाईप असे एकूण २ लाख रुपयांचे नुकसान झाले. दरम्यान, या घटनेची माहिती नवनाथने भाऊ महादेव, वायरमन कदम यांना फोनवरून दिली. असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोलीस नाईक जाधव करीत आहेत.

# पंढरपुरात वारी कालावधीत ७२ संशयितांवर कारवाई

## पोलीस प्रशासनाच्या कामगिरीचे कौतुक

## दोन गुन्हे उघडकीस; ७८,७०० रुपयांचा ऐवज जप्त

**सुराज्य/पंढरपूर**

कार्तिकी वारी कालावधीत पंढरपूर शहरात श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यभरातून दहा लाखहून अधिक भाविक दाखल झाले होते. दरम्यान, पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेऊन ७२ संशयितांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर सीआरपीसी कलम १०९ प्रमाणे कार्यवाही केली.त्यामुळे गुन्ह्यांवर मोठ्या प्रमाणात प्रतिबंध झाला. पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेऊन शांततेत वारी झाल्याबद्दल पोलीस प्रशासनाचे कौतुक केले जात आहे.

कार्तिक वारीः २०२३ या कालावधीमध्ये पंढरपूर शहरामध्ये श्री विठ्ठल रुक्मिणीच्या मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र, कर्नाटकसह अन्य राज्यातील भाविक येत असतात. सदर भाविकांचे दागदागिने, मौल्यवान वस्तू, रोख-रक्कमेची चोरी होऊ नये, गुन्ह्यांवर प्रतिबंध, आळा बसावा, यासाठी पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव यांनी वेळोवेळी पंढरपूर शहर पोलीस ठाणे, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांना मार्गदर्शन केले. त्यानुसार पंढरपूर शहर पोलीस ठाणे, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण पोलिसांनी कार्तिकी वारीमध्ये विशेष पथके तयार केली होती. साध्या आणि वारकरी वेषातील पोलिसांनी शहारातील गर्दीच्या ठिकाणी चंद्रभागा वाळवंट, मंदीर परीसर, बस स्टँड, रेल्वे स्थानक, ६५ एकर परिसरासह अन्य गर्दीच्या ठिकाणी संशयित व्यक्तींच्या हालचालींवर नजर ठेवली होती. सदर पथकांनी ७२ संशयित व्यक्तींना ताब्यात घेतले. त्यांची माहिती काढून त्यांच्यावर सीआरपीसी कलम १०९ प्रमाणे कार्यवाही केली. त्यामुळे गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात प्रतिबंध बसला.

**५० पोलीस अंमलदारांनी केली कामगिरी**

पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग डॉ. अर्जुन भोसले, पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरूण फुगे, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही यशस्वी कामगिरी केली. ही जबाबदारी सहायक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे, प्रकाश भुजबळ, शशिकांत शेळके, महारुद्ध परनणे, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत भागवत, पोलीस उपनिरीक्षक सुबोध जमदाडे यांच्या पथकांतील एकूण ५० पोलीस अंमलदारांनी पार पाडली आहे.



शारीरिक आणि मालमत्तेविषयीच्या गुन्ह्यावर प्रतिबंध, आळा बसावा यासाठी पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेकडील पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, कर्मचारी हे सातत्याने (पेट्रोलिंग) गस्त घालत होते. दरम्यान, पोलिसांनी दोन गुन्ह्यांमध्ये तीन आरोपींकडून ११ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, एक मोबाईल हँडसेट असा ७८,७०० रुपये किमंतीचा चोरी गेलेला मुद्देमाल उघडकीस आणून सदरचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दरम्यान, पहिल्या घटनेत नवीन बस स्टँडवर दोन महिला संशयास्पदरित्या फिरताना आढळल्या. पोलीसांनी त्यांच्यावर पाळत ठेवली. सदर संशयित महिला कार्तिकवारीमध्ये आलेल्या महिला भाविक दिपाली चव्हाण (वय-५२, धानोरी, पुणे) या बसमध्ये चढत असताना त्यांची नजर चुकवून ११ ग्रॅम वजनाचे काळे मणी असलेले सोन्याचे मंगळसूत्र हे गळ्यातून काढून चोरून घेऊन जात होती. त्यावेळी तिच्यावर पाळत ठेऊन असलेल्या पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे चोरीस गेलेला मुद्देमाल सापडला. त्यांच्याविरूध्द फिर्यादींनी तक्रार दिल्याने पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करून त्या दोघी महिला आरोपींना अटक केली आहे.

अन्य एका दुसऱ्या घटनेत प्रभाकर सुखदेव खरात (आझाद चौक, अकलूज) हे गावी जाण्यासाठी बसमध्ये चढत होते. दरम्यान, त्यांचे खिशातून मोबाईल चोरी करणाऱ्या एका संशयिताला पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदारांनी रंगेहाथ पकडून त्याला घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे चोरीला गेलेला मोबाईल हँडसेट सापडला. पंढरपूर शहर पोलीस ठाण्यामध्ये सदरचा गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली.

## वर्कऑर्डर काढून काम सुरू करण्याची नानासाहेब राणे यांची मागणी

# नीरा-देवघरसाठी दीडशे कोटींचा निधी मंजूर

**सुराज्य/नातेपुते**


नीरा-देवधर पाणी संघर्ष समितीचे बावीस गावातील सर्व कार्यकर्त्यांच्या प्रयत्नातून राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अर्थसंकल्पामध्ये दीडशे कोटी रुपयांची तरतूद करून त्याला मंजुरी दिली आहे. परंतु, नुसती मंजुरी न देता वर्क ऑर्डर काढून उर्वरित रखडलेले काम सुरू करावेत. यासाठी नीरा-देवधर संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब राणे यांनी आ. राम सातपुते यांची भेट घेऊन नीरा-देवधर कॅनॉलचे रखडलेले काम लवकरात लवकर सुरू होण्याबाबत निवेदन दिले.

नानासाहेब राणे यांनी रखडलेल्या कामाविषयी माहिती देत असताना सांगितले की, माळशिरस तालुक्यामधील नीरा-देवघर धरण लाभ क्षेत्रातील जवळपास ३० गावाला फार मोठा दुष्काळ पडला आहे. पिण्याचे पाणी, जनावरांच्या चारा-पाणी प्रश्न, शेतीसाठी लागणारे पाणीप्रश्न सध्या गंभीर विषय बनले आहेत. आपल्या माध्यमातून मागील बऱ्याच महिन्यांपासून शासकीय टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविले जात आहे.



नातेपुतेः नीरा-देवधरचे रखडलेले काम सुरू करण्याबाबत आ. राम सातपुते यांना निवेदन देताना संघर्ष समितीचे नानासाहेब राणे.

या भागाचा कायमचा दुष्काळ संपविण्यासाठी तात्पुरती सोय अथवा योजना करण्याऐवजी नीरा-देवघर धरणाचे सन २००० पासून रखडलेले केनॉलचे अपूर्ण कामकाज पुर्णत्त्वास आणावेत. माळशिरस तालुक्यातील दुष्काळी भागाचा कायमचा दुष्काळाचा कलंक पुसण्यात यावा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपली ताकद वापरून त्यानुसारच हा अपूर्ण प्रकल्प वर्कऑर्डर काढून मार्गी लावावा, अशी आशा आ. राम सातपुते यांच्याकडून नानासाहेब राणे यांनी व्यक्त केली. आ. राम सातपुते यांनी या निवेदनातील रखडलेल्या नीरा-देवधर कामाला सकारात्मक प्रतिसाद देत लवकरात लवकर वर्कऑर्डर काढून काम करण्याचे आश्वासन दिले.



कासेगावः दक्षिण सोलापूर तालुका काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी दत्तात्रय गजभार यांच्या निवडीचे पत्र देताना सुशीलकुमार शिंदे, चेतन नरोटे आदी.

# दक्षिण सोलापूर काँग्रेस कमिटी उपाध्यक्षपदी दत्तात्रय गजभार

**सुराज्य/कासेगाव**

दक्षिण सोलापुरातील गुरुदत्त शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय मारुती गजबार यांची दक्षिण सोलापूर काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या नियुक्तीचे पत्र माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी दक्षिण सोलापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हरीश पाटील, शहराध्यक्ष चेतन नरोटे उपस्थित होते. दत्तात्रय गजबार मूळचे कासेगांव येथील रहिवासी आहेत.

त्यांनी गुरुदत्त शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून आनंदराव देवकते प्रशाला, वडजी, कै.काशीबाई इंडे प्रशाला अशा दोन शिक्षण संस्था त्यांनी कार्यरत ठेवल्या आहेत.

# गारवाड येथे रिपाइं शाखेच्या नामफलकाचे उद्घाटन

**सुराज्य/वेळापूर**

गारवाड (माळशिरस) येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) शाखा, युवा आघाडी शाखेचे उद्घाटन झाले. रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरच्या शाखेचे उद्घाटन झाले. याचे उद्घाटन तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या नेतृत्त्वाखाली पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष एन.के. साळवे, पश्चिम महाराष्ट्र सचिव दयानंद धाईंजे यांच्या हस्ते झाले.

यावेळी युवा आघाडी राज्य उपाध्यक्ष किरण धाईंजे, जिल्हा उपाध्यक्ष श्यामराव भोसले, जिल्हा उपाध्यक्ष एस.एम. गायकवाड, जिल्हासंघटक तुकाराम बाबर, जिल्हासचिव भारत आठवले, जिल्हासचिव रमेश धाईंजे, ज्येष्ठ नेते आबा बनसोडे, मार्गदर्शक भास्कर बनसोडे, तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, सरचिटणीस मारुती खांडेकर, कार्याध्यक्ष समाधान भोसले, युवक तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, संघटन सचिव पोपट गेजगे, सरचिटणीस प्रवीण साळवे, कार्याध्यक्ष विनोद रणदिवे, सरपंच सुभाष साठे, उपसरपंच धनाजी मगर,माजी सरपंच नानासो मगर, चेअरमन उत्तम मगर, बाळासो मगर, दीपक पवार, तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे, उपाध्यक्ष राम कांबळे, उपाध्यक्ष शेखर सावंत, उपाध्यक्ष बापुसाहेब पोळके, माजी जिल्हा परिषद सदस्य रामहरी नवगिरे, संपर्कप्रमुख अण्णासाहेब भोसले, सचिव समाधान भोसले, श्रीपूर अध्यक्ष गणेश सावंत, पुरंदावडे अध्यक्ष रोहन ओवाळ, आतिश आठवले उपस्थित होते.



वेळापूरः गारवाड येथे रिपाइं आठवले गट शाखेच्या उद्घाटनप्रसंगी मिलिंद सरतापे, एन.के.साळवे, दयानंद धाईंजे, किरण धाईंजे, श्यामराव भोसले, एस.एम.गायकवाड, तुकाराम बाबर, भारत आठवले,रमेश धाईंजे, आबा बनसोडे, भास्कर बनसोडे आदी.

याप्रसंगी शाखेच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी झाल्या. शाखा अध्यक्ष गौतम लोंढे, युवक अध्यक्ष सतीश करडे, संघटक तात्यासो लोंढे, योगेश लोंढे, उपाध्यक्ष सुशांत करडे, निलेश लोंढे, कार्याध्यक्ष अनिल लोंढे, वैभव लोंढे, खजिनदार बापू करडे, दिलीप साठे, सचिव तानाजी करडे, अजय साठे, मार्गदर्शक उत्तम साठे, विक्रम लोंढे, संजय माने, बाळू लोंढे या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार झाला. सूत्रसंचालन आण्णसो भोसले, आभारप्रदर्शन सरपंच सुभाष साठे यांनी केले.

# सव्वा लाख वारकरी, भाविकांनी घेतला महाआरोग्य शिबिराचा लाभ



**सुराज्य/पंढरपूर**

राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' हे ब्रीदवाक्य घेऊन कार्तिकी वारी कालावधीत राबविण्यात आलेले महाआरोग्य शिबीर वारकरी-भाविकांसाठी आरोग्याची पर्वणीच ठरले. याअंतर्गत शासकीय आरोग्य विभागाने तब्बल १ लाख २५ हजार ५२ वारकऱ्यांना सर्व प्रकारच्या मोफत आरोग्य सेवेचा लाभ दिला. या महाआरोग्य शिबिराचा ७० हजार ८०३ वारकऱ्यांनी लाभ घेतला.

आषाढीनंतर कार्तिकी वारीत वारकऱ्यांच्या आरोग्य सेवेसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने मोठे परिश्रम घेतले. यासाठी दि. १९ नोव्हेंबरपासून २० ठिकाणी संपूर्ण यंत्रणा सज्ज ठेवली होती. ६५ एकर परिसरात ३ दिवस महाआरोग्य शिबिरात एकाच छताखाली अतिदक्षता विभागासह सर्व प्रकारच्या आरोग्य तपासणी, प्रतिबंधात्मक ते निदानात्मक उपचारांची व्यवस्था केली होती.

**आरोग्य विभागाच्या दोन हजार कर्मचाऱ्यांची अहोरात्र सेवा**

आरोग्य विभागाचे दोन हजार डॉक्टर्स, अधिकारी, कर्मचारी, जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, भैरवनाथ शुगरचे एक हजारावर स्वयंसेवक, शिवसेना शिंदे गटाचे शेकडो पदाधिकारी, शिवसैनिकांनी वारकऱ्यांसाठी अहोरात्र परिश्रम घेतले.

तसेच ३ ठिकाणी 'आपला दवाखाना'मधून ७ हजार ४४४ औषधोपचार केंद्रातून ५ हजार ५६१, ८ प्राथमिक आरोग्य केंद्रातून २ हजार ३०० उपजिल्हा रूग्णालयात ५ हजार , ५ अतिदक्षता विभागात ११ हजार ६७५, आरोग्य दुतांमार्फत १८ हजार ८०१, तर ७ रूग्णवाहिकांनी २ हजार ८६१ वारकरी रूग्णांना सेवा दिली. १८ हजार ६०० वारकऱ्यांची नेत्रतपासणी करून १५ हजार ४८६ जणांना चष्मे वाटप केले.



जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. राधाकिसन पवार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले, उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षिका जयश्री ढवळे, तालुका आरोग्य अधिकारी एकनाथ बोधले यांच्या नेतृत्त्वाखाली १ हजार ९९२ अधिकारी, कर्मचाऱ्यांनी वारकऱ्यांची आरोग्य सेवा केली. भैरवनाथ शुगरचे उपाध्यक्ष अनिल सावंत, शिवसेनेच्या प्रवक्त्या ज्योती वाघमारे, तालुका प्रमुख शिवाजी बाबर, दत्तात्रय सावंत, मुन्ना भोसले, रामचंद्र जाधव, श्याम गोगाव, नितीन शेळके, संजय बंदपट्टे, बालाजी बागल, आरती बसवंती आदींच्या मार्गदर्शनाखाली एक हजारावर स्वयंसेवक शिवसैनिक परिश्रम घेत होते.

आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. शिवाजी सावंत, अनिल सावंत हे स्वतः या ठिकाणी तळ ठोकून सर्व व्यवस्था पाहत होते. आरोग्य विभागाने वारी कालावधीत १ लाख २५ हजार वारकऱ्यांना विविध प्रकारची आरोग्य सेवा दिली. यात महाआरोग्य शिबिरात तब्बल ७० हजार वारकऱ्यांनी विविध आरोग्य तपासणी, औषधोपचार घेतले.

## संक्षिप्त वृत्त

### रोजगार निर्मितीला पुण्यात 'खो'

**पुणे** : राज्यातील युवक-युवतींनी नोकरी करण्याऐवजी स्वतःचा उद्योग-व्यवसाय सुरू करून



रोजगारदाते व्हावे, या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाला (सीएमईजीपी) बँकांचा खो' बसत आहे. या योजनेंतर्गत पुण्यातील पंधराशेहून अधिक नवउद्योजकांची कर्ज प्रकरणे बँकांकडे प्रलंबित आहेत. बँकांच्या या उदासीनतेचा फटका राज्यातील रोजगार निर्मितीला बसत आहे.

### एक कोटीची खंडणी, कृषी सहाय्यक महिलेवर कारवाई

**नाशिक** : आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करण्याची धमकी देणाऱ्या कृषी सहाय्यक महिलेचे



अखेर निलंबन करण्यात आले आहे. तसेच तिची खातेनिहाय चौकशी केली जाणार असल्याची माहिती देखील मिळाली आहे. या प्रकरणातील संशयित सारिका बापूराव सोनवणे (४२) हिने दिंडोरी येथील स्वामी समर्थ अध्यात्मिक पिठाचे विश्वस्त यांच्याकडे दहा लाखाची खंडणी मागितली होती. पैसे घेताना सारिका सोनवणेसह तिचा मुलगा मोहित बापूराव सोनवणे (२५) याला पोलिसांनी रंगेहाथ पकडले होते. या घटनेनंतर कृषी सहसंचालकांनी सारिका सोनवणे यांच्या निलंबनाचा आदेश काढला असून तिची चौकशी केली जाणार आहे.

### शिर्डीच्या साईंच्या चरणी तब्बल १७ कोटी अर्पण

**अहमदनगर** : देशभरातील प्रसिध्द असलेल्या मंदिरांमध्ये अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डीच्या



साईबाबा मंदिराचे नाव हे नेहमीच घेतलं जातं. साईबाबा संस्थान हे देशातल्या श्रीमंत मंदिरापैकी एक आहे. देश-विदेशातून लोक शिर्डीच्या साईबाबाचं दर्शन घेण्यासाठी येतात. हे श्रध्दाळू भक्तगण दानपेटीत आपलं दान साईबाबांना अर्पित करत असतात. त्यामध्ये यावेळी दिवाळीच्या सुट्टीमध्ये दहा दिवसांमध्ये तब्बल १७ कोटी ५० लाख ५६ हजार ०८६ इतकं भरघोस दान प्राप्त झालं आहे. १० ते २० नोव्हेंबर दरम्यान, असेलल्या दिवाळीच्या सुट्टीत असंख्य साईभक्तांनी साईबाबांचं दर्शन घेतलं. या दहा दिवसांच्या उत्सवात संस्थानला विविध स्वरुपात तब्बल १७ कोटी ५० लाख ५६ हजार ०८६ इतकं भरघोस दान प्राप्त झाल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. शिवा शंकर यांनी दिली. त्यामुळे या दहा दिवसांत साईबाबांच्या चरणी दररोज पावणे दोन कोटी प्राप्त झाल्याचं दिसून आलं आहे.

# परराज्यात दूध संघांकडून चांगला दर, महाराष्ट्रात लूट

## शेतकऱ्यांची महत्त्वाची मागणी

सुराज्य/धाराशिव

**धाराशिव जिल्ह्यात पर्जन्यमान कमी झाल्यामुळे जिल्ह्यातील ३ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर झाले. आहेत उर्वरित तालुक्यातील काही महसूली मंडळे दुष्काळसदृष्य जाहीर झाल्याने बळीराजा अडचणीत आला आहे. अशातच दुधाचे दर कमी झाल्यामुळे दुध उत्पादक शेतकरी पुन्हा अडचणीत आला आहे. शेतकऱ्यांना दुधाचा आधार असताना दुधाचा दर कमी झाल्याने बळीराजा मेटाकुटीला आलाय.**



धाराशिव जिल्ह्यामध्ये सात लाखांपेक्षा अधिक पशुधन आहे. त्यापैकी जवळपास अडीच लाख पशुधन हे परंडा, भूम, वाशी तालुक्यात आहे. या तीन तालुक्यांमध्ये जवळपास सात लाख लिटर दूध संकलन केले जाते. त्यापैकी पंधरा टन खवा हा दररोज आठ राज्यांमध्ये विक्रीसाठी जातो. तर या तीन तालुक्यातील दूध संकलन परराज्यात व परजिल्ह्यातील जवळपास २० दूध संघ हे दूध घेऊन जातात. त्यापैकी परराज्यातील दूध संघ हे या दुधाला चक्क ३४ रुपये दर देतात. मात्र, दुसऱ्या जिल्ह्यातील दूध संघ शेतकऱ्यांना हे २७ ते २८ रुपये दुधाला दर देतात.

शासनाने गाईच्या दुधाला ३४ रुपये व म्हशीच्या दुधाला ४२ रुपये असा दर जाहीर केला असताना, तसा जीआर सुद्धा काढलेला असताना देखील या जीआर प्रमाणे कुठल्याही दूध संघावर दूध खरेदी करताना सध्या तरी दिसत नाही. यामुळे सध्या शेतकऱ्यांचे दूध प्रति लिटर सहा ते सात रुपयांनी कमी दराने खरेदी करत असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे दुष्काळी जिल्ह्यातील शेतकरी पुन्हा संकटात आला आहे.

वाढलेले पशुखाद्याचे दर, मजुरांचा खर्च, वैद्यकीय खर्च व चारा खर्च वजा केल्यास हा दार शेतकऱ्यांना परवडत नाही. गाईच्या दुधाला ४० रुपये पेक्षा जास्त व म्हशीच्या दुधाला ६० रुपयाच्या अधिकचा दर मिळावा अशी शेतकऱ्यांमधून मागणी होत आहे. साखर कारखान्याला जसा एफआरपीप्रमाणे दर दिला जातो, तसाच दर या शेतकऱ्यांच्या दुधाला सुद्धा हमीभाव मिळावा, अशी मागणी आता शेतकरी वर्गातून होऊ लागली आहे. जर शेतकऱ्याच्या दुधाला निश्चित भाव मिळाला तरच बळीराजा जिवंत राहील अन्यथा पुन्हा आत्महत्येचे सत्र सुरू होऊ शकतं, अशी शक्यता शेतकऱ्यांनी बोलून दाखवली

# मोदींची तेजसमधून अवकाशात उड्डाण

सुराज्य/नवी दिल्ली



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या स्वदेशी लढाऊ विमान तेजसमधून अवकाशात उड्डाण केले. बेंगळुरू येथील हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) ला भेट दिल्यानंतर त्यांनी तेजसमधून हे उड्डाण केलं.

तेजसमधून केलेल्या उड्डाणानंतर नरेंद्र मोदी यांनी भारतीय वायुसेना, [illegible] आणि [illegible] तसेच सर्व भारतीयांचे अभिनंदन केले. तेजस हे स्वदेशी हलके लढाऊ विमान आहे जे कोणत्याही हवामानात उडू शकते. हे दोन पायलट असलेले लढाऊ विमान आहे. त्याला लिफ्ट म्हणजेच लीड-इन फायटर ट्रेनर म्हणतात. त्याला ग्राउंड अटॅक एअरक्राफ्ट असेही म्हणतात. म्हणजे गरज भासल्यास त्याच्या सहाय्याने हल्लाही केला जाऊ शकतो. भारताचे स्वदेशी लढाऊ विमान तेजस जगभरात प्रसिद्ध आहे.

हलके लढाऊ विमान तेजस खरेदी करण्यात अनेक देशांनी स्वारस्य दाखवले आहे. संरक्षण उत्पादनांच्या स्वदेशी उत्पादनावर मोदी सरकार सातत्याने भर देत आहे. अमेरिका संरक्षण क्षेत्रातील दिग्गज जीई एरोस्पेसने पंतप्रधानांच्या यूएस दौऱ्यादरम्यान एमके-२-तेजससाठी संयुक्तपणे इंजिन तयार करण्यासाठी एचएएलसोबत करार केला होता. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या वर्षी एप्रिलमध्ये सांगितले होते की, २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात भारताच्या संरक्षण निर्यातीने १५,९२० कोटी रुपयांचा उच्चांक गाठला आहे. हवाई दलाने एचएएलला १२३ तेजस विमानांची ऑर्डर दिली असून त्यापैकी २६ विमाने देण्यात आली आहेत. हे सर्व तेजस मार्क-१ आहेत.

# महापरिनिर्वाण दिनी १४ अतिरिक्त रेल्वे सोडणार

सुराज्य/नवी दिल्ली

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वेने १४ अनारक्षित विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. ३ स्पेशल गाड्या नागपूर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई, ६ स्पेशल गाड्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई/दादर ते सेवाग्राम/अजनी/नागपूर, २ स्पेशल गाड्या कलबुर्गी ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई दरम्यान, २ स्पेशल गाड्या धावतील. सोलापूर आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई आणि एक विशेष गाडी अजनी ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंत धावेल आणि विशेष गाड्यांचा तपशील खालीलप्रमाणे-

**नागपूर-मुंबई अनारक्षित विशेष तीन गाड्या**

१. विशेष गाडी क्रमांक ०१२६२ नागपूरहून ४.१२.२०२२ रोजी २३.५५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी १५.३० वाजता पोहोचेल. २. विशेष गाडी क्रमांक ०१२६४ ही ५.१२.२०२२ रोजी सकाळी ०८.०० वाजता नागपूरहून सुटेल आणि

### अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वेचा निर्णय



त्याच दिवशी २३.४५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबईला पोहोचेल. ३. विशेष गाडी क्रमांक ०१२६६ ५.१२.२०२२ रोजी नागपूरहून १५.५० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबईला दुसऱ्या दिवशी १०.५५ वाजता पोहोचेल.

**कुठे कुठे थांबणार?** : अजनी, सेवाग्राम, वर्धा, पुलगाव, धामणगाव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, जलंब, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, नाशिकरोड, इगतपुरी, कसारा, कल्याण आणि दादर.

# शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणारा कायदा रद्द करु नये

## स्वतंत्र भारत पार्टीची मागणी

सुराज्य/मुंबई

शेतकऱ्यांना विकलेल्या कृषी निविष्ठा निकृष्ट दर्जाच्या असल्यामुळं शेतकऱ्यांचे झालेले नुकसान भरुन देण्यासाठी महाराष्ट्र शासनानं प्रस्तवित केलेले कायदे मागे घ्यावेत, यासाठी काही संघटनांकडून शासनावर दबाव टाकला जात आहे. सरकारनं या दबावाला बळी पडू नये. या कायद्यांमध्ये सुधारणा करुन कायदे आंमलात आणावेत यासाठी स्वतंत्र भारत पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कृषीमंत्री धनंजय मुंडे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवले आहे.



खते, बियाणे किंवा कीटकनाशके निकृष्ट, कमी प्रत, बनावट किंवा पिकांना नुकसानकारक असतील आणि त्यामुळं शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले तर त्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी सध्या कोणताही कायदा अस्तित्वात नाही. महाराष्ट्र शासनाची शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर वचक असावी. तसेच अशा गुन्हेगारांना कठोर शासन व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने कायद्यात दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. शेतकऱ्यांची फसवणूक थांबण्यासाठी आणि फसवणूक झाल्यास नुकसान भरपाई मिळण्यासाठी अशा कायद्यांची गरज असल्याचे मत घनवट यांनी व्यक्त केले.

कृषी निविष्ठा बाबतच्या कायद्याबद्दल कृषी सेवा केंद्र मालक, वितरक, उत्पादक कंपन्यांमध्ये अनेक गैरसमज आहेत. त्यामुळं कायदे रद्द करण्याची मागणी केली जात आहे. अशी मागणी करणे शेतकऱ्यांचे नुकसान करणारी आहे.

## निधन वृत्त

### भागवत सोनवणे

**सांगोला** : शहरातील



भागवत शिवाजी सोनवणे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. ते ॲड. रोहित सोनवणे यांचे ते चुलते होत.

### कल्पना कोल्हटकर

**सोलापूर** : होटगी रोडवरील गुरुछाया अपार्टमेंट येथील



रहिवाशी कल्पना केशव कोल्हटकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७२ वर्षांच्या होत्या. कल्पना कोल्हटकर या पाटबंधारे विभागात ३५ वर्षे कार्यरत होत्या.

### मुकुंद तडवळकर

**सोलापूर** : जुळे सोलापूर येथील मुंकुद



तडवळकर यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमी येथे अत्यंसस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांचा केटरिंगचा व्यवसाय होता.

# शिवकुमार यांच्या सीबीआय चौकशीची परवानगी मागे

सुराज्य/कर्नाटक

कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांची सीबीआय चौकशी करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा यांनी दिलेली तोंडी परवानगी बेकायदा होती, त्यामुळे ती मागे घेतली असा खुलासा मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शुक्रवारी केला.



बेहिशेबी मालमत्ता प्रकरणी शिवकुमार यांच्या सीबीआय चौकशीला आधीच्या भाजप सरकारने परवानगी दिली होती. यासंबंधीचा भाजप सरकारचा निर्णय कायद्यानुसार नव्हता असे नमूद करत सिद्धरामय्या सरकारच्या मंत्रिमंडळाने गुरुवारी चौकशीची परवानगी रद्द केली. राज्य सरकारच्या या निर्णयावर भाजपने जोरदार टीका केली आहे. बी एस येडियुरप्पा यांच्या नेतृत्वाखालील सरकारने २५ नोव्हेंबर २०१९ रोजी शिवकुमार यांच्या सीबीआय चौकशीला परवानगी दिली होती. त्यानंतर सीबीआयने ३ ऑक्टोबर २०२० रोजी शिवकुमार यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल केला होता. शिवकुमार यांनी १ एप्रिल २०१३ ते ३० एप्रिल २०१८ या कालावधीत ७४ कोटी ९३ लाख रुपयांची बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याचा आरोप त्यामध्ये ठेवण्यात आला होता. या कालावधीत शिवकुमार तत्कालीन काँग्रेस सरकारमध्ये ऊर्जामंत्री होते.

## 'नीट' परीक्षेत प्रवेश युवकाची आत्महत्या

**नागपूर** : वैद्यकीय आणि अभियांत्रिकीच्या प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी विदर्भ व छत्तीसगड तसेच मध्य प्रदेशातूनही विद्यार्थी नागपुरात येतात. शहरात खोलीवर राहून ते अभ्यास करतात. अशाच 'नीट'च्या तयारीसाठी शहरात आलेल्या एका युवकाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अथर्व सत्येंद्र श्रीवास्तव (१७, ए टू झेड व्हेंचर पी. जी. हॉस्टेल, गोकुळपेठ) असे या मृत विद्यार्थ्याचे नाव आहे.

# तुळजाभवानी देवीचे दागिने वितळविणार

## शिर्डी संस्थानच्या धर्तीवर होणार अंमलबजावणी

सुराज्य/उस्मानाबाद

महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवींच्या चरणी भाविकांनी अर्पण केलेले सोन्या-चांदीची दागिने वितळविण्यास विधी व न्याय विभागाने मंजुरी दिल्यानंतर आता नियमावली तयार करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.



भाविकांनी २००९ ते २०२२ या काळात अर्पण केलेले २०७ किलो सोने व दोन हजार ५७० किलो चांदीचे दागिने वितळविण्यासाठी शिर्डी येथील साईबाबा संस्थानकडून जशी प्रक्रिया अवलंबली जाते, त्याच पद्धतीने श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानची नियमावली तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी सात सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून समिती शिर्डी संस्थानला रवाना झाली आहे.

भाविकांनी अर्पण केलेल्या सोन्या-चांदीच्या मौल्यवान वस्तू वितळवून एकत्र करून बँकेत ठेवण्याबाबतचा ठराव तुळजाभवानी मंदिर समितीने जुलै २०२३ आणि ऑगस्ट २०२३ रोजी घेतला होता.

# नक्षलवाद्यांकडून तरुणाची हत्या

## गेल्या १० दिवसातील तिसरी घटना

सुराज्य/गडचिरोली

गडचिरोली जिल्ह्यात पुन्हा एकदा नक्षलवाद्यांनी एका निर्दोष आदिवासी तरुणाची हत्या केली आहे. रामजी चिन्ना आत्राम असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यात कापेवंचा जवळ नक्षलवाद्यांनी रामजी आत्रामची गोळ्या घालून हत्या केली आहे. गेल्या दहा दिवसात प्रचंड सक्रिय होऊन नागरिकांना टार्गेट करत असल्याचे चित्र आहे.

रामजी आत्राम यांनी गेल्या वर्षी नक्षलवाद्यांची काही माहिती पोलिसांना पुरवली होती. त्यानंतर पोलिसांसोबत झालेल्या एका एन्काऊंटरमध्ये एका महिला नक्षलवादी मारली गेली होती, असा आरोप ठेवत नक्षलवाद्यांनी रामजी आत्राम यांची हत्या केली. त्या ठिकाणी तशा आशयाचे पत्रकही ठेवले आहे.

### दहा दिवसात तिघांची हत्या

गेल्या दहा दिवसात निर्दोष नागरिकांच्या हत्येची ही तिसरी घटना आहे. दि. १५ नोव्हेंबर रोजी भामरागड तालुक्यात पेनगुंडा येथे दिनेश गावडे या युवकाची हत्या करण्यात आली होती. तर २३ नोव्हेंबर रोजी टिटोळा येथे पोलीस पाटील लालसु वेडदाची हत्या करण्यात आली होती. आता शुक्रवारी रात्री अहेरी तालुक्यात रामजी आत्रामची हत्या करण्यात आली आहे.

नक्षलवाद्यांकडून निर्दोष नागरिकांच्या हत्येची गडचिरोलीतील ही तिसरी घटना आहे. या तिन्ही घटना दक्षिण गडचिरोलीत घडल्या असून तिथे नक्षलवादी अचानक




गडचिरोलीतील भामरागड तालुक्यातील लाहेरी पोलीस मदत केंद्राअंतर्गत येणाऱ्या गोंगवाडा ते पेनगुंडा रोडवरील पेनगुंडा गावाजवळ ही घटना घडली आहे. लाहेरी गावातील रहिवासी असलेला दिनेश गावडे हा बुधवार १५ नव्हेंबर रोजी गावातून कामानिमित्त बाहेर गेला होता. त्या दिवशी तो घरी परतलाच नाही. १६ नोव्हेंबर सकाळी त्याचा मृतदेह रस्त्यावर आढळून आला असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. यावेळी घटनास्थळी नक्षल्याकडून एक पत्र देखील ठेवण्यात आले आहे. या घटनेचा तपास लाहेरी पोलीस करत आहे.

मात्र, या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून नक्षलवाद्यांच्या कारवाईला कधी पायबंद घातला जाईल असा प्रश्न नागरिकांनी उपस्थिती केला आहे.

# कराचीत मॉलला आग, ९ जणांचा होरपळून मृत्यू

सुराज्य/कराची

पाकिस्तानातील कराचीमधील रशीद मिन्हास रोडवर असलेल्या आरजे मॉलमध्ये शनिवार २५ नोव्हेंबर रोजी भीषण आग लागली. या आगीत ९ जणांचा मृत्यू झाला असून १ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आलीये. कराचीतील स्थानिक रुग्णालये आणि पोलिसांनी डॉन न्यूजला दिलेल्या माहितीनुसार, रुग्णालयांमध्ये ९ मृतदेह आणण्यात आले आहेत. आठ मृतदेह जिना पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल सेंटर जेपीएमसी आणि एक मृतदेह सिव्हिल हॉस्पिटल कराची येथे आणण्यात आले. ते पुढे म्हणाले की, '१८ वर्षीय जखमी मुलीला नुकतेच कराचीच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते पण उपचारादरम्यान



तिचा मृत्यू झाला.'

या संपूर्ण घटनेचा अहवालही कराचीच्या मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात आला आहे. वृत्तानुसार, जिल्हा उपायुक्त अल्ताफ शेख यांनी सांगितले की आग लागल्यानंतर २२ लोकांना मॉलमधून वाचवण्यात यश आले. दरम्यान यामध्ये जखमी झालेल्यांना जिना पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल सेंटर जेपीएमसीमध्ये हलवण्यात आले. पण यामध्ये उपचारादरम्यान एकाचा मृत्यू झाला. परिस्थिती पाहून चौथ्या मजल्यापर्यंत इमारत रिकामी करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे.

## संक्षिप्त वृत्त




सोलापूर : शिवसेनेचे पहिले जिल्हा प्रमुख स्व.बाबुराव वडणे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.त्याप्रसंगी पुरुषोत्तम बरडे, विष्णू कारमपुरी, शिवसैनिक दिसत आहेत.

### शिवसेनेचे पहिले जिल्हा प्रमुख बाबुराव वडणे यांना श्रद्धांजली

**सोलापूर** : शिवसेनेचे पहिले जिल्हा प्रमुख स्व. बाबुराव वडणे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. बाबुराव वडणे यांनी शिवसेना स्थापना झाल्यापासून ते सोलापूरचे पहिले शहर प्रमुख आणि पहिले जिल्हाप्रमुख म्हणून पदभार सांभाळला होता. एका छोट्याशा शाखेद्वारे त्यांनी त्याकाळी शिवसेनेचे काम सुरू केले. ते कट्टर शिवसैनिक म्हणून अखेरच्या श्वासापर्यंत शिवसेनेसोबत राहिले. त्यांनी शिवसेना कधी सोडली नाही. ते एक सच्चा शिवसैनिक होते, असे प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सोलापूर लोकसभा क्षेत्र प्रमुख पुरुषोत्तम बरडे यांनी श्रद्धांजली वाहिली. स्व. बाबुराव वडणे यांच्या निवासस्थानी सोलापूर लोकसभा क्षेत्र प्रमुख पुरुषोत्तम बरडे, सोलापूर मनपा क्षेत्र प्रमुख विष्णू कारमपुरी, उपशहर प्रमुख शिवशंकर ढोकळे, शाखाप्रमुख विजय निली, संभाजी कोंडगे यांच्यासह शिवसैनिकांनी त्यांच्या निवासस्थानी भेट दिली. स्व. बाबुराव वाडणे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

### स्वस्त धान्य दुकानदारांचे १ डिसेंबरपासून आंदोलन

**सोलापूर** : राज्यातील स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन शॉप फेडरेशन परवानाधारक महासंघ राज्य आणि देशव्यापी आंदोलन करणार आहे. ऑल इंडिया फेअर प्राईज शॉप डिलर्स फेडरेशन, नवी दिल्ली यांच्याशी संलग्नित महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार आणि केरोसीन शॉप फेडरेशन परवानाधारक महासंघाने राज्य आणि देशव्यापी आंदोलन करणार आहेत. आपल्या विविध मागण्यांकडे शासन दुर्लक्ष करीत आहे. त्यांचे लक्ष वेधण्यासाठी सदरचे आंदोलन केले जाणार आहे. या आंदोलनाचा पहिला टप्पा म्हणून दि. १ डिसेंबर रोजी राज्यभरातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्वस्त धान्य दुकानदार एक दिवसीय धरणे आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधणार आहेत. हिवाळी अधिवेशनाच्या काळात धान्य दुकानदार नागपुरात आक्रमक पवित्रा घेणार आहेत. ऑल इंडिया फेअर प्राईजल शॉप डिलर फेडरेशनच्यावतीने राज्य, देशभरातील स्वस्त धान्य दुकानदार दि. १ जानेवारी २०२४ पासून आपली स्वस्त धान्य दुकाने न्याय हक्काच्या मागणीसाठी केंद्र, राज्य सरकारच्या विरोधात पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यभरातील सर्व रेशनकार्डधारक धान्यापासून वंचित राहिल्यास त्याची सर्व जबाबदारी राज्य, केंद्र सरकारवर राहील, असा इशाराही या विनेदनाद्वारे दिला आहे.

### माढा, जेऊरला हुतात्मा एक्सप्रेस थांबवा: धैर्यशील मोहिते-पाटील



**अकलूज** : माढा आणि करमाळा तालुक्यातील जेऊर रेल्वे स्थानकावर सोलापूर-पुणे हुतात्मा एक्सप्रेसला थांबा मिळविण्यासाठी धैर्यशील मोहिते-पाटील हे प्रयत्नशील आहेत. त्यांनी रेल्वेचे केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना पत्र लिहून जेऊर हुतात्मा एक्सप्रेस थांबवून प्रवाशांची गैरसोय दूर करण्याची निवेदनाद्वारे मागणी केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील लोकांना सोयीचे असलेल्या जेऊर, माढा रेल्वे स्टेशनवर नेहमी प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. पुण्याला दररोज शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी ये-जा करीत असतात. विविध कामांनिमित्त ये-जा करणारे प्रवासी, नोकरदार वर्ग, हॉस्पिलटलला जाणाऱ्यांची मोठी वर्दळ असते. या रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी हुतात्मा एक्सप्रेसला थांबा मिळण्याची आवश्यकता आहे. जर सोलापूर-पुणे हुतात्मा एक्सप्रेसला माढा, आणि जेऊर येथील रेल्वे स्थानकावर थांबा मिळाले तर या शहरातील नागरिकांना मोठा फायदा होईल. शिक्षण व्यवसायांच्या दृष्टीने या शहरांच्या विकासाला चालना मिळेल. दळण वळणाच्या दृष्टीने हुतात्मा एक्सप्रेसचा थांबा सोयीचा आणि गरजेचा आहे. यासंदर्भात रेल्वे मंत्रालय, रेल्वे बोर्डाकडे पाठपुरावा करणार असल्याचे धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले.



सोलापूरः जश्ने ईद-ए-मिल्लादुन्नबी जुलूस कमिटीच्यावतीने गरजू विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यात आले.

### सामाजिक कार्यासाठी अर्थसहाय्य

**सोलापूर** : सोलापूर शहर जश्ने ईद-ए-मिल्लादुन्नबी जुलूस कमिटीच्यावतीने गरजूंना अर्थसहाय्य देण्यात आले. मिसबा जाकीर पटेल या गरजू विद्यार्थीनीला महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षा व उच्च शिक्षणासाठी २० हजार रुपयांची तर अल्पसंख्यांक महिला वेल्फेअर ट्रस्ट या सामाजिक संघटनेला पाच हजार रुपयांची आर्थिक मदत संस्थाध्यक्ष ॲड. यु.एन. बेरिया उत्सव समितीचे अध्यक्ष मतीन बागवान यांच्या हस्ते एन.आर. बेरिया शैक्षणिक संकुलात देण्यात आली. याप्रसंगी म.हनिफ बडेपीर, वाहिद नदाफ उत्सव समितीचे जनरल सेक्रेटरी अखलाक दिना, उपाध्यक्ष जावीद खरादी, ईस्माईल ऊर्फ मुन्ना शेख, याकूब शेख, जाकीर पटेल, समद कुरेशी, आयाज दिना आदी उपस्थित होते.

# चिनी कापडाच्या आयातीमुळे होतोय लाखो कामगारांचे नुकसान

**अक्कलकोटरोड औद्योगिक वसाहतीमध्ये कारखानदार, कामगारांची झाली बैठक**

**चिनी मालावर बंदी घालण्याची भाजपा उपाध्यक्ष दायमा यांची पंतप्रधानांकडे मागणी**

सुराज्य/सोलापूर

**चीनकडून आयात होणाऱ्या मायक्रो फायबर टॉवेल, मॅनमेड फॅब्रिक्स, टॉवेल, रेडीमेड कपडे यामुळे भारतातील लाखो कामगारांचे नुकसान होत आहे. त्यामुळे या आयातीवर तत्काळ बंदी घालावी, अशी मागणी सोलापूर भारतीय जनता पार्टीचे शहर उपाध्यक्ष श्रीनिवास दायमा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे ईमेलद्वारे केली आहे. याबाबत अक्कलकोट रस्ता औद्योगिक वसाहतीत शनिवारी कारखानदार आणि कामगारांची बैठक झाली.**



यावेळी श्रीनिवास दायमा म्हणाले, चीनमधून येणाऱ्या कपड्यांमुळे भारतातील विशेषतः सोलापुरातील कापड उद्योगाला मोठा फटका बसत आहे. चीनहून भारतात येणारा माल तेथील निर्यात करणारे व्यापारी भारतातील व्यापाऱ्यांना कमी रकमेचे बिल करून पाठवत आहेत. तसेच उर्वरित पैसा हवालामार्फत पाठवले जात असल्याची माहिती मिळत आहे. परिणामी भारत सरकारला मिळणारा मोठा कर लपविला जात आहे.

या संपूर्ण प्रकाराची चौकशी करून दोषी व्यापाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच चीनमधून येणाऱ्या मायक्रो फायबर टॉवेल आणि मॅनमेड फॅब्रिक्सवर तत्काळ बंदी घालावी, अशी मागणी श्रीनिवास दायमा यांनी यावेळी केली. या बैठकीनंतर तत्काळ कारखानदार आणि कामगारांच्या मागणीचे निवेदन पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राचे वस्त्रोद्योगमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना ई मेल द्वारे पाठविण्यात आले.

सोलापूरचा टॉवेल उद्योग वाचवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणी लक्ष घालावे अशी मागणी यावेळी कारखानदारांनी केली. या बैठकीस भाजप शहर उपाध्यक्ष श्रीनिवास दायमा, निलेश फोफलिया, श्रीनिवास दुभास, गजानन बोकडे, सदानंद कोडम, श्रीनिवास कामुनी, नागेश गुंडला, देवसानी, कमल फोफलिया आदी उपस्थित होते.

**सोलापुरातील दोन लाख जणांना बसला फटका**

सोलापूर शहरात टॉवेल, रेडीमेड कपडे, इतर कपडे उत्पादनाचा कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय आहे. चीनमधून करचुकवेगिरी करून भारतात येणाऱ्या सुमार दर्जाचे टॉवेल, कपड्यांमुळे सोलापूर शहरातील या उत्पादनांना असलेली मागणी थंडावली आहे. परिणामी, यावर अवलंबून असलेल्या कारखानदार, कामगार आणि इतर अशा तब्बल दोन लाखांहून अधिक जणांवर प्रचंड मोठे संकट ओढवणार आहे. त्यामुळे आता राज्य, केंद्रीय स्तरावरून ठोस पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

## सोलापूर रेल्वे स्थानकाच्या डेव्हलपमेंटचे काम सुरू

सुराज्य/सोलापूर



सोलापूर रेल्वे स्थानक परिसरात परिसर नेहमीच वाहतुतीसाठी अडचणी येत होत्या. त्यामुळे हा परिसर विस्तृत करण्यासाठी अमृत स्टेशन स्कीम अंतर्गत तिसऱ्या टप्प्यात विशेष गुप्तचर शाखेची बिल्डिंग तोडण्यात आली.

सदरची बिल्डींग १०० स्क्वेअर मीटर परिसरात व्यापलेले होते. त्यामुळे विस्तारित रेल्वे स्थानक परिसर उपलब्ध होईल. प्रवाशांना इतर सुविधा करून देता येणे शक्य होईल. यासाठी मंडल रेल प्रबंधक नीरजकुमार दोहरे, अवनीश वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली अमृत स्टेशन स्कीमअंतर्गत स्टेशन डेव्हलपमेंटचे काम जोमाने सुरु झाल्याचे सांगण्यात आले.

अमृत स्टेशन स्कीमअंतर्गत स्टेशन डेव्हलपमेंटचे काम सुरु झाले आहे. रेल्वे स्थानक परिसरातील तिसऱ्या टप्प्यात 'विशेष गुप्तचर शाखाची' बिल्डिंग तोडण्यात आली. दरम्यान, नुकतीच स्टेशन परिसरातील सर्वात जुनी अशी पोलीस चौकीदेखील पाडण्यात आली होती.

## ओंकार साखर कारखान्याचा २७०० रुपयांचा पहिला हप्ता

**बाबुराव बोत्रे-पाटील यांची माहिती**



**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याचा पहिला २७०० रुपयांचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केल्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी सांगितले. गळीत हंगामाच्या शुभारंभाप्रसंगी दिलेला शब्द पाळला आहे.

ओंकार परिवारची ऊस दराबाबत कोणाशीही कसलीही स्पर्धा नसून, शेतकऱ्यांना महागाईच्या काळात जास्तीत जास्त दर देऊन आपण शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचा प्रामाणीकपणे प्रयत्न करीत आहोत.

## गायरान अतिक्रमणामुळे वडकबाळचे सरपंचपद रद्द

सुराज्य/दक्षिण सोलापूर

वडगबाळ येथील गायरान गट क्रमांक- १२५ मधील मिळकत क्रमांक- ३०७ व ३५४ मध्ये अतिक्रमण करून वास्तव्यास राहत असल्याचे सिद्ध झाल्याने वडकबाळच्या सरपंच पूजा विलास राठोड, सदस्या अनिता गणपती राठोड यांचे पद रद्द करण्याचा निर्णय विभागीय आयुक्त कार्यालयाने दिला आहे.

दि. १७ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी गायरान जमिनीवरील अतिक्रमणामुळे वडकबाळच्या सरपंच, सदस्यांचे पद रद्द करण्याचे आदेश दिले होते. मात्र सरपंच पूजा राठोड यांनी विभागीय आयुक्त कार्यालयात दि. ८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाला स्थगिती देण्याबाबत अपिल दाखल केले होते. त्यानुसार दोन्ही गटाची बाजू ऐकल्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयाने दि. २१ नोव्हेंबर रोजी सरपंच पूजा राठोड व सदस्या अनिता राठोड या गायरान जागेवर अतिक्रमण करीत असल्यामुळे त्यांचे पद रद्द करण्याचा निर्णय दिला. याबाबत उमाबाई बिराजदार, वर्षा माळशिकारे, विलास कांबळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती.

## संविधान प्रस्ताविकेचे विद्यार्थी करणार वाचन

**वतनदार महार परिषदेच्या ९६ व्या वर्धापन दिनानिमित्त ट्रस्टतर्फे आयोजन**

सुराज्य/सोलापूर

बुधवार पेठ, मिलिंदनगर येथील समस्त महार वतनदार ट्रस्टच्यावतीने संविधान दिन आणि वतनदार महार परिषदेच्या ९६ व्या वर्धापन दिनानिमित्त रविवार, दि. २६ आणि सोमवार, २७ नोव्हेंबर रोजी संविधान प्रस्ताविकेचे वाचन आणि व्याख्यानाचे आयोजन केल्याची माहिती ज्येष्ठ नेते सुभान बनसोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मिलिंदनगर येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी प्रांगणात दोन्ही कार्यक्रम होणार आहे. संविधान दिनानिमित्त रविवार, दि. २६ नोव्हेंब रोजी सकाळी १० वाजता संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात येणार आहे. यावेळी विविध शाळेतील विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी विद्यार्थ्यांना ऐतिहासिक पंचाची चावडीचा इतिहास, सन १९२७ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वतनदार महार परिषदेतील आठवणी, अस्थिविहारची माहिती समस्त महार वतनदार ट्रस्टच्यावतीने देण्यात येणार आहे. सोमवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता दि. २६ व २७ नोव्हेंबर १९२७ रोजीच्या वतनदार महार परिषदेतील संवाद आणि आठवणींचा उजाळा या विषयावर प्रा.डॉ. सारीपुत्र तुपेरे यांचे व्याख्यान होणार आहे.




यावेळी प्रमुख मार्गदर्शक ट्रस्टी अध्यक्ष देविदास बाबरे, ज्येष्ठ नेते राजाभाऊ सरवदे, सुभान बनसोडे, निवृत्त तहसीलदार बी. के. तळभंडारे, ज्येष्ठ वतनदार उत्तम आबुटे, नागनाथ सरवदे आदी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सुभान बनसोडे यांनी यावेळी केले. या पत्रकार परिषदेस शशी तळमोहिते, संजय बाबरे, श्रीनिवास सरवदे, अनिकेत आबुटे, अजित सरवदे, शिवम सोनकांबळे आदी उपस्थित होते.

## ग्रामदैवत माहूरच्या आईची यात्रा; नान्नजमध्ये रंगणार कुस्त्यांचा फड

**उत्तर सोलापूर** : नान्नज येथील ग्रामदैवत माहूरच्या आईचा यात्रा महोत्सव मंगळवार, दि. २८ नोव्हेंबरला होणार असल्याची माहिती यात्रा पंच कमिटी व नान्नज ग्रामपंचायतवतीने देण्यात आली आहे.



या यात्रेनिमित्त कुस्त्यांचे मैदान भरणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. ग्रामदैवत माहूरची आई देवीची यात्रा कार्तिक महिन्यातील त्रिपुरारी पौर्णिमेनंतर दुसऱ्या दिवशी भरत असते. सोमवार, दि.२७ नोव्हेंबर रोजी पौर्णिमेच्या दिवशी रात्री गावातील माळीगल्लीतील नंदाईदेवी मंदिरापासून माहूरची आई देवीची पालखी, काठ्यांची सवैद्य मिरवणूक काढण्यात येणार असून, त्यांची नगरप्रदक्षिणा काढली जाते. मंगळवार, दि.२८ रोजी यात्रेच्या दिवशी सकाळी १० वाजता नंदाईदेवी मंदिरापासून गावातील प्रमुख मार्गावरून पालखी, नंदिकोल (काठ्या) मिरवणूक ग्रामदैवत माहूरची आई मंदिराकडे प्रस्थान होणार आहे. दुपारी २ वाजता माहूरची आई देवी मंदिराला प्रदक्षिणा, सायंकाळी ५ वाजता मंदिरापासून नान्नज गावाकडे काठ्या, पालखींचे प्रस्थान होईल.

नगरप्रदक्षिणा करीत रात्री १० वाजता नंदाईदेवी मंदिराजवळ पालखी मिरवणूक विसर्जन होणार आहे. बुधवार, दि.२९ नोव्हेंबर रोजी जी.बी. घोडके विद्यालयासमोर छत्रपती कुस्ती संघाच्यावतीने कुस्त्यांचे मैदान, बुधवार, दि. २९ नोव्हेंबर रोजी 'लावण्यरंग' हा सांस्कृतिक कार्यक्रम होईल.

## चाकूने मारहाण; तरुण जखमी

सुराज्य/सोलापूर

बेगमपूर (मोहोळ) येथे चाकू आणि बांबूने केलेल्या मारहाणीत सागर रमेश भोई (वय-२९) हा गंभीर जखमी झाला.

जखमी भोई हा शुक्रवारी रात्री आपल्या शेतात कांद्याचे पीक पाहण्यासाठी गेला होता. त्यावेळी इनामदारने बांबू आणि चाकूने त्याला मारहाण केली. त्याला मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून भाऊ समाधान याने सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## भाजपच्या अभियंता सेल जिल्हाध्यक्षपदी प्रा. चनशेट्टी

सुराज्य/सोलापूर



भारतीय जनता पक्षाच्या सोलापूर अभियंता सेलच्या जिल्हाध्यक्षपदी प्रा. अनिकेत चनशेट्टी यांची निवड झाली आहे. भाजप जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.

त्यांनी महाराष्ट्रातील बोरामणी येथील कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुलाचे शैक्षणिक संचालक म्हणून कार्यरत आहेत. रॉबिनहूड आर्मीचे सहप्रमुख, युथ फॉर डेव्हलपमेंटचे जिल्हाध्यक्ष, माणुसकी फाऊंडेशनचे उपाध्यक्ष व डॉ. हेडगेवार रक्तपेढी, सोलापूरचे तज्ज्ञ सल्लागार म्हणून आपली सामाजिक सेवा बजावत आहेत. चनशेट्टीह यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक तालुक्यामध्ये इंजिनीअर सेलचे काम जोमात सुरु ठेवण्यासाठी प्रत्येक तालुक्यातून एक स्वतंत्र कार्यकारिणी निवडण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

**व्हीपी शुगर्स कारखान्याकडून शेतकऱ्यांना दिलेल्या शब्दाची वचनपूर्ती : व्ही.पी.पाटील**

# शेतकऱ्यांच्या खात्यावर २७०० रुपयांचा हप्ता जमा

- **जनकल्याण, रुपामाता बँकेच्या संबंधित शाखेत ऊस, तोडणी वाहतूक बिले जमा**
- **ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी ठेकेदारांच्या मागणीनुसार इतर बँकेतही बिले जमा**

सुराज्य/अक्कलकोट

तडवळ येथील व्हीपी शुगर्स कारखान्याने दि. १०, ११ आणि १५ नोव्हेंबर अशा दोन टप्पातील प्रती टन २७०० रुपयांप्रमाणे ऊस बिलाचा पहिला हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट जमा केली आहे, अशी माहिती चेअरमन व्ही.पी. पाटील यांनी दिली आहे.

पाटील म्हणाले, कारखाना सुरु झाल्यापासून दि. १५ नोव्हेंबरपर्यंतचे ८० टक्के कमिशनसह ऊस तोडणी वाहतुकीची बिले जमा केली आहेत.



ऊस, तोडणी वाहतुकीचे बिले जनकल्याण व रुपामाता बँकेच्या संबंधित शाखेत जमा केली आहेत. ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी वाहतूक, ठेकेदार यांच्या मागणीनुसार संबंधित इतर बँकेतही बिले जमा केलेली आहेत. कारखान्याचे दररोज ५ हजार मेट्रीक टन गाळप सुरु आहे.

दररोज ७५०० मेट्रीक टन उसाचा पुरवठा आहे. एकूण गाळप ७१,५०० मेट्रीक टन झाले असून, ६० लाख युनिट विजनिर्मिती झाली आहे. ३७.५२ लाख युनिट विज निर्यात केलेली आहे. ऊस उत्पादक शेतकरी व तोडणी वाहतूक ठेकेदारांनी कारखान्यावर विश्वास दाखवला आहे, त्यामुळे कारखाना सुरळीतपणे सुरु आहे. कारखान्याने २७०० रुपये प्रती टनाप्रमाणे ऊस बिल, तोडणी वाहतुकीचे ८० टक्के कमिशनसह १५ नोंव्हेंबरपर्यंतची बिले जमा केल्यामुळे आनंदाचे व समाधानाचे वातावरण आहे.



त्यामुळे कारखान्याला ७५०० ते ८००० मेट्रीक टन उसाची उपलब्धता झाली आहे, असेही पाटील यांनी सांगितले. प्रशासनाने सर्वपुरवठादार शेतकरी, तोडणी वाहतूक ठेकेदारांचे आभार मानले आहे.